|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ४१ सोमवार दि. २ ऑक्टोंबर २०२३ ते रविवार दि. ८ ऑक्टोंबर २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## दारूच्या व्यसनापाई आईचे हाल झाले जन्मदात्या बापाला मुलानेच ठार केले

नागपुर/क्राईम रिपोर्टर

दारुडा माणूस जेंव्हा कुटुंबासाठी डोकेदु:खी ठरतो, तेंव्हा कुटुंबातील रक्ताच्या नात्यातली माणसेच त्याच्या जीवावर उठतात. अशावेळी कुणी नाती गोती बघत नाहीत. नागपूरमध्ये अशाच एका घटनेत दारू पिऊन सतत पत्नीला मारझोड करणाऱ्या एका दारुड्या वडिलांना त्याच्या मुलानेच ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

दारू पिऊन आईला मारहाण करणाऱ्या वडिलांची मुलानेच हत्या केली आहे. नागपूरात ही घटना घडली असून या ...पान २ वर

## सहा महिन्यातच त्यांच्या प्रेम विवाहाची शोकांतिका झाली सासू-मेव्हण्याला जिवंत जाळून जावयाने आत्महत्या केली

अमरावती/क्राईम रिपोर्टर

नाते कोणतेही असो ते टिकवण्यासाठी नातेवाईकांशी समजूतदारपणे आणि जबाबदारीने वागायचे असते. नात्यात भलेही काही कारणावरून मतभेद झालेले असेल तरी ते मतभेद शक्यतो जास्त ताणायचे नसतात. उलट नात्यातल्या लोकांना प्रेमाने जिंकायचे असते. अर्थात ते सर्वांनाच जमत नाही. खास करून ज्यांचे प्रेमविवाह होतात. त्यांच्या कुटुंबियांच्या नात्यात सहसा लवकर गोडवा निर्माण होत नाही. पण प्रेमविवाह नंतर त्या जोडप्याला मुले बाळे झाली की मग हळूहळू दोन्ही कुटुंबातील वाद संपुष्टात येतात. पण त्यासाठी ज्यांचा प्रेमविवाह झालेला असतो त्यांच्यात प्रेमाचे विश्वासाचे आणि सामंज्यासाचे नाते निरंतर टिकून रहावे लागते. आपल्या मुलीने प्रेमविवाह केला असला तरी ती सासरी सुखाने नांदत आहे हे जेंव्हा मुलीचा आई-वडिलांच्या किंवा भावाच्या लक्षात येते तेंव्हा मग त्यांच्या मनातील पूर्वीचा राग शांत होतो. म्हणूनच ज्यांचे प्रेमविवाह झालेले असतात त्यांनी संसारात आयुष्यभर परस्परांचा विश्वास जपायचा असतो, त्यातून सुखाचा संसार करून आमचे एकमेकांवर पूर्वी इतकेच निस्सीम प्रेम आहे हे समाजाला दाखवायचे असते. तरच प्रेमविवाह टिकतात आणि प्रेमविवाह करणारे आयुष्यभर त्यांच्या संसारात सुखाने रहातात. पण त्यासाठी दोघांमध्ये समंजसपणा असावा लागतो. वाद झाले तरी एकमेकांना सांभाळून घेण्याची तयारी असावी लागत. पण दुर्दैवाने तसे झाले नाही तर 'लव्ह स्टोरी'चे भयानक घटनेत रूपांतर होऊ शकते. अमरावती जिल्ह्यातील वंडलीमध्ये राहणाऱ्या आशिष याचा लता भोंडे यांच्या मुलीशी प्रेमविवाह झाला होता. या प्रेम विवाहाला दोन्ही कुटुंबाचा विरोध होता, त्यातच अवघ्या सहा महिन्यातच पती पत्नीच्या नात्यात दुरावा आला आणि पत्नी पुन्हा नांदायला न येण्याचा निर्णय घेऊन कायमची माहेरी गेली. या घटनेमुळे आशिष इतका चिडला की त्याने सासुरवाडीला जाऊन सासू व मेव्हण्याला पेट्रोल टाकून जाळले आणि त्यानंतर स्वःतही आत्महत्या केली. या घटनेने संपूर्ण तालुका हादरून गेला आहे.







अमरावतीमध्ये जावयाने सासू आणि मेव्हण्याला जिवंत जाळल्याची धक्कादायक घटना वरुड तालुक्यातील वंडली येथे घडली आहे. सासू आणि मेव्हण्याचा खून केल्यानंतर जावयाने स्वत:लाही पेटवून घेत आत्महत्या केली. या घटनेमुळे अमरावतीमध्ये खळबळ उडाली आहे. या घटनेत तिघांचा मृत्यू झाला. रविवारी रात्री १ वाजण्याच्या सुमारास हा सगळा धक्कादायक प्रकार घडल्याचे समोर आलं आहे. आरोपी आशिष ठाकरे (वय २५ वर्षे) असे जावयाचे नाव आहे. तर सासू लता सुरेशराव भोंडे (वय ४५ वर्ष) आणि मेव्हणा प्रणय सुरेशराव भोंडे (वय २० वर्षे) अशी जळून खाक झालेल्यांची नावे आहेत. आशिषचा लता भोंडे यांच्या मुलीशी काही महिन्यांपूर्वी प्रेमविवाह झाला होता. त्यांच्यातील प्रेमसंबंध धोंडे कुटुंबीयांना मान्य नव्हते. मात्र कालांतराने या दोघांमध्ये वारंवार खटके उडू लागले. त्यांच्यामधील वाद विकोपाला गेला आणि मुलगी पुन्हा तिच्या आईकडे राहण्यासाठी आली. आशिष पत्नीला घ्यायला लता भोंडे यांच्या घरी गेला होता. मात्र लता भोंडे आणि त्यांच्या मुलाने मुलीला आशिषसोबत पाठवण्यास नकार दिला. त्यांच्यात जोरदार भांडण देखील झाले होते. त्यानंतर रविवारी पत्नी घरी नसताना आशिष सासूच्या घरी गेला. त्यानंतर त्याने सासू आणि मेव्हण्याला जिवंत जाळले. त्यानंतर त्याने स्वत:लाही संपवून घेतले. तीन वर्षापासून सुरू असलेल्या दोघांच्या प्रेमाचे रूपांतर मार्च महिन्यात विवाहात झाले होते. धमक्या देऊन विवाह केल्याने सहा महिन्यातच दोघांचा काडीमोड देखील झाला होता. या प्रकरणी पोलीस स्टेशनला तक्रारी झाल्या. पण सहा महिने पूर्ण होण्याच्या एक दिवसांपूर्वीच आशिषने सासू आणि मेव्हण्याला पेट्रोल टाकून जिवंत मारले. त्यानंतर आशिषनेही आत्महत्या केली आहे. दोघांच्या प्रेमविवाहाला मुलींच्या आई वडीलांचा आणि भावाचा प्रचंड ...पान २ वर

## पैशांमुळे तुटते दोस्ती यारी मित्रांनी तोडली आयुष्याची दोरी




पुणे (पिंपरी चिंचवड)/क्राईम रिपोर्टर

**मित्र श्रीमंत असला की त्याच्या कडून त्याच्या मित्रांना अपेक्षा असतात. पण त्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत की मग मैत्रीचे रूपांतर दुष्मनित होते. पुण्याच्या म्हाळगी परिसरात राहणारा सचिनचे वडील उद्योजक होते आणि सचिनही त्यांना त्यांच्या व्यवसायात मदत करायचा. दरम्यान सचिनचे दोन मित्र होते. गोरख आणि रोहित दोघेही कर्जबाजारी होते. कर्ज फेडण्यासाठी त्यांनी सचिनकडे २ लाख मागितले होते. पण एवढी रक्कम देण्यास सचिनने नकार दिल्याने चिडलेल्या गोरख व राहुलने सचिनचा खून केला. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफीने त्यांना अटक केली.**

पिंपरी चिंचवड परिसरातील म्हाळंगे परिसरात हरिराम यादव हे आपल्या कुटूंबासह राहयला आहेत. त्याचा उदयोग धंदा मोठा असल्याने त्याच्या घरची परिस्थीती ही सधन होती त्यातच त्यांनी अलिकडे आपल्या १९ वर्षीय मुलगा सचिन यादव याला एक कंपनी काढून दिली.या कंपनीचा कारभार सचिन यादव हा पाहत होता. वयाच्या मानाने तो त्या कंपनीचा कारभार पाहण्यासाठी सक्षम झालेला नव्हता.त्याचे वडिल त्याला कारभार पाहण्यासाठी मदत करीत होते. अशातच २४ सप्टेंबर २०२३ रोजी सचिन हा घरातून कोणाला काही न सांगता निघून गेला होता.त्याच्या वडिलांनी त्याचा दोन दिवस शोध घेतला परंतु तो काही मिळून आला नाही म्हणून हरिराम यादव यांनी जवळचे म्हाळंगे पोलीस स्टेशन गाठून आपला मुलगा सचिन यादव वय१९ वर्ष हा बेपत्ता झाला असल्याची तक्रार नोंदविली. पोलीस या घटनेचा वेगवेगळ्या ॲगलनी तपास करीत होते. कारण सचिन यादव हा श्रीमंत घरातील तरूण होता. त्याचे कुणी पैशासाठी अपहरण केले असण्याची शक्यता होती. त्या अनुषंगाने पोलीस तपास करीत होते. तर दुसरीकडे पिंपरी चिंचवड स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांना निमगाव येथील जंगलात एका २० वर्षीय तरूणाचा मृतदेह मिळाला होता. त्या मयत तरूणाच्या डोक्यात कुणी तरी अज्ञातांनी दगड घातला होता. त्याच्या डोके फुटून त्यातून रक्तस्त्राव मोठया प्रमाणात झाल्याने त्याचा मृत्यू झाला होता. पोलीसांनी पहिल्यांदा त्या मयत तरूणाची ओळख पटवली. मयत तरूण हा म्हाळंगे परिसरातून बेपत्ता झालेला सचिन यादव हा असल्याची माहिती मिळाल्यावर पोलीसांनी मयताचा आणि घटनास्थळाचा पंचनाम करून मृतदेह शवविच्छेदनसाठी सरकारी ...पान २ वर

## दारूमुळेच सख्खा भाऊ पक्का वैरी झाला भावाला निर्घृणपणे ठार मारून तुरुंगात गेला

सांगली/क्राईम रिपोर्टर



**दारूच्या नशेत कधीकधी माणसाला रक्ताच्या नात्याचाही विसर पडतो. मिरज तालुक्यातील नांद्रे गावात राहणाऱ्या राहुलला दारूचे व्यसान होते. त्यामुळे त्याची पत्नी त्याला सोडून गेली. त्यामुळे तो अधिकच दारू पिवून घरातल्या लोकांना त्रास देऊ लागला. त्याच्या त्रासाला वैतागून आई वडीलही घरातून बाहेर गेले. तरीही राहुल त्यांना त्यांच्या मागे शिव्या घालू लागला. हे त्याचा धाकटा भाऊ दत्ताला सहन झाले नाही. त्यामुळे त्याने राहुलला जाब विचारला. त्यावरून दोघांचे भांडण झाले. यावेळी दत्ताने मोठ्या भावाला काठीने झोडपायला सुरुवात केली. त्यामुळे दारूच्या नशेत असलेल्या राहुलने मागचा पुढचा विचार न करता दत्तावर कोयत्याने वार करून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी राहुलला अटक केली आहे.**

सांगली जवळील नांद्रे येथे प्रकाश कुंभार हे आपल्या पत्नी आणि दोन मुलासह राहयला आहेत. त्याचा मोठा मुलगा राहूल उर्फ बसवेश्वर याचे लग्न त्यांनी गेल्या सात वर्षापूर्वी केले होते. परंतु घरातील कौटूंबिक वादातून त्याची पत्नी त्याला सोडून तिच्या माहेरी गेली होती. त्यामुळे राहूल हा दारू पिऊन घरातील आई वडिल आणि भाऊ दत्तात्रय याचेबरोबर कायम वाद घालून भांडण ...पान २ वर

## शुल्लक वादातून टिकम सिंग चिडला विक्रम सिंगचा त्याने काटा काढला

मुंबई/एस.कुमार



**काही माणसे अशी असतात की त्यांच्याशी कोणाचा वाद झाला किंवा शुल्लक कारणावरून हातपायी झाली तरी त्या घटनेबद्दल ते डूख धरून बसतात आणि संधी मिळताच घाव घालतात. दारूच्या नशेत विक्रमसिंह नावाच्या मजुराने टिकमसिंगला मारहाण केली होती, तोच राग मनात ठेऊन विक्रमसिंग याचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**



सपोनि प्रमोद हावळे

मांगीलाल भुराराम चौधरी (वय ३०) याचा खार येथील रोजीबाई चाळ, रूम नंबर १ साईबाबा रोड, आदर्श लाईन बी. एम. सी. शाळेच समोर जवाहरनगर, या ठिकाणी चहाचा स्टॉल आहे. तो मुळचा राजस्थान येथील पाली जिल्ह्यातील मु. पो. सादडी, ता. देसूरीचा रहिवासी आहे. त्याचे खार रोड रेल्वे स्थानकाचे लगत पूर्वेस १८ वर्षापासून साईनाथ टी स्टॉल आहे. त्या ठिकाणी तो राहत आहे. त्याच्यासोबत त्याच्या गावच्या शेजारील गावात राहणारा विक्रम सिंग (वय ३५) हा सुमारे १० महिन्यांपासून राहत आहे. तो मजुरीचे काम करून त्याचा उदरनिर्वाह करतो, विक्रमचे मुळगाव मु.पो.सिन्दली, ता. देसूरी, जि. पाली, राज्य राजस्थान असे आहे. विक्रम सिंग यास जास्त दारू पिण्याची सवय असून तो रात्रीच्या वेळी वांद्रे टर्मिनस रेल्वे फलाटावर यासाठी जात असे. १९ सप्टेंबर रोजी मांगीलाल चौधरी हा आपल्या चहा स्टॉलवर असताना त्याच्या स्टॉलवर काम करणारा राहुल सिंग (वय २६) याने सकाळी ६:४५ वा सुमारास मोबाईल फोन वरून संपर्क करून कळविले की, विक्रम सिंग हा वांद्रे टर्मिनस रेल्वे स्थानक फलाट क्र. १ वर बाजूकडील लाकडी हातगाडीवर ...पान २ वर

## बापावर वार करताच थोरला चिडला धाकट्या भावाचा त्याने मुडदा पाडला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



**नशा करणारा माणूस हा कुटुंबासाठी त्रासदायक असतो. कारण नशेत तो घरातल्या लोकांनाही त्रास देतो आणि बाहेरच्या लोकांनाही त्रास देतो. मालेगाव येथे रहाणारा जाविद हा सुद्धा असाच नशेडी होता. त्यामुळे घरचे लोक त्याला घरातच साखळीने बांधून ठेवायचे. पण एक दिवस मात्र त्याने बाहेर जाण्याचा हट्ट धरला. पण त्याला बाप सोडेना. त्यामुळे त्याने बापावर चाकूने वार केला. हे पाहून तिथे आलेला त्याचा मोठा भाऊ मुद्दसीर अहमद चिडला आणि त्याने चाकुचे वार करून आपला नसेडी धाकटा भाऊ जाविदला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

जमिल अहमद मोहमद असगर (वय ६०) हे आपल्या एकत्रित कुटुंबासह घ.नं. २१२, म्हाडा प्लॉट, नूरबाग, मालेगाव येथे रहातात. पत्नी तस्लीमा बानो, सात मुले नदीम अहमद, वसीम अहमद, नविद अहमद, मोईन अहमद, मुद्दसीर अहमद, मतीन अहमद व जाविद अहमद असे सर्व जण त्यांच्या एकत्रित कुटुंबात रहातात. सहाही मुलांचा विवाह झाला असून लहान मुलगा जाविद अहमद हाच फक्त अविवाहित होता. जाविद हा नेहमी वेगवेगळ्या ...पान २ वर

## संशयाने पतीची मती गुंग झाली पत्नीला ठार मारून आत्महत्या केली

निफाड (नाशिक)/क्राईम रिपोर्टर

**पती पत्नी ही संसाराच्या गाड्यांची दोन चाके असतात. त्यामुळे व्यवस्थित आणि एकमेकांवरील विश्वासाने चालायला हवीत. पण तसे झाले नाही तर संसार उध्वस्त होतो. विशाल आणि धनश्री यांच्या बाबतीत असेच झाले होते. विशाल सतत पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारझोड करायचा. हा प्रकार पाहून धनश्री हिच्या वडिलांनी तिला कायमचे आपल्याकडे माहेरी आणून ठेवायचे ठरवले होते. मात्र हे विशाल याला समजताच तो भयंकर चिडला आणि त्याने रात्री झोपेतच पत्नी धनश्रीच्या डोक्यात पाटा घालून तिची हत्या केली व स्वतःही आत्महत्या केली.**



नाशिक जिल्ह्यातील कोळगाव पो. खेडलेझुंगे (ता.निफाड) या गावात शंकर कचरू बाघ (वय ५२) हे मजुरी काम करणारे गृहस्थ परिवारासह रहातात. त्यांना दोन मुली असून दोन्हीपैकी लहान मुलगी गावातच दिली आहे, तर मोठी मुलगी धनश्री उर्फ प्रिती हिचा - विवाह आडगाव येथील विशाल निवृत्ती घोरपडे (रा. तुळजाभवानी रो हाऊस, इच्छामणीनगर) याच्यासोबत पाच वर्षापूर्वी विवाह झाला होता. या दाम्पत्याला ४ वर्षाचा रूद्र नावाचा मुलगाही आहे. विशालची आई लिलाबाई (वय ६५) हीदेखील त्यांच्यासोबत रहाते. शंकर आता जबाबदारीतून मुक्त झाले होते. दोन्ही मुली संसारात रमल्या होत्या. त्यांचे संसार फुलले होते. सारे काही आलबेल आहे असे वाटत असले तरी परिस्थिती थोडी वेगळी होती. लग्न झाल्यानंतर विशालने धनश्री हिला सुरूवातीचे दोन महिने चांगले वागवले, त्यानंतर मात्र त्याचे वागणे बदलले. त्या दोघांमध्ये वाद होवू लागले. काही दिवसांनी तो धनश्रीच्या चारित्र्याचा संशय घेवू लागला. हे संशयाचे भूत त्याच्या मानगुटीवरच बसले होते. धनश्री हिचे परिसरातील एका युवकाशी अनैतिक संबंध आहेत असा तो संशय घेत होता. तो तिला संशयावरून त्रास देऊ लागला होता. काही दिवस तिने सहन केले, पण आता तो जास्तच त्रास देऊ लागल्यानंतर मात्र तिने त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या मनातील संशय काही कमी होत नसल्यामुळे तीही त्रासून गेली ...पान ६ वर

## राहुलच्या गुंडागर्दीने वैतागले गावकरी जन्मदात्या बापाने दिली हत्येची सुपारी

सिन्नर/क्राईम रिपोर्टर

**स्वतःचे मुल कितीही आई-वडिलांना प्रिय असले तरी तो जेंव्हा कुटुंबासाठी समाजासाठी तापदायक ठरतो तेंव्हा नाईलाजाने त्याच्या बाबत आई-वडिलांना टोकाचा निर्णय घ्यावा लागतो. सिन्नर तालुक्यातील पस्ते गावातील राहुल आव्हाड हा सुद्धा असाच होता. आई -वडिलांना मारहाण करणे. गावात गुंडागर्दी करणे. यामुळे वडिल शिवाजी आव्हाड राहुलच्या वर्तणुकीचा वैतागले होते. अखेर त्यांनी आपल्या या बिघडलेल्या मुलाची सुपारी देऊन त्याचा गेम केला. मात्र पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**



मयत राहुल आव्हाड

मुलाची सुरू असलेली गावगुंडी, सतत मद्यपान करणे आणि घरात आई-वडिलांना होणारी मारहाण असह्य झाल्यामुळे जन्मदात्या पित्यानेच ७० हजार रुपये सुपारी देऊन त्याला संपवल्याची घटना सिन्नर तालुक्यातील पास्ते येथे मंगळवारी (दि.२७) सकाळी ११ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. सिन्नर पोलिसांनी जलद गतीने तपास करत या प्रकरणात मयत तरुणाच्या वडिलांसह आणखी दोघांना अटक केली आहे. राहुल शिवाजी आव्हाड (३०) असे मयत तरुणाचे नाव आहे. सतत मद्यपान करून गावात गावगुंडी करणे व घरात देखील आई-वडिलांना नेहमीच मारहाण करण्याचे प्रकार राहुल कडून सुरू होते. त्याच्या व्यसनाला घरातले आणि गावातली मंडळी देखील वैतागलेली होती. मंगळवारी दि.२७ सकाळी अकरा वाजेच्या सुमारास पास्ते शिवारातील बंद पडलेल्या स्फोटक कंपनीच्या मीटर हाऊसमध्ये राहुल मृत अवस्थेत पडलेला असल्याचे सिन्नर पोलिसांना समजले पोलीस निरीक्षक राजेंद्र कुटे यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी गाव घेतली. एका खोलीत गळा आवळून फाशी दिलेल्या अवस्थेत राहुलचा मृतदेह पोलिसांना आढळून आला. तर जवळच दारूच्या रिकाम्या बाटल्या देखील असल्याने पोलिसांकडून घातपाताचा संशय व्यक्त करण्यात आला. यानंतर पोलिसांनी तपास करत या घटनेचे मूळ गाठण्यात यश मिळवले. मुलाच्या वाईट प्रवृत्तीमुळे जन्मदात्या बापानेच त्याला सुपारी देऊन संपवण्याचा धक्कादायक प्रकार पोलीस तपासात उघड झाला. शिवाजी आव्हाड यांनी गावातीलच वसंता अंबादास आव्हाड (४०) व विकास उर्फ बबलू शिवाजी कुटे (४२) या दोघांना राहुलला ठार मारण्याची सुपारी दिली होती ...पान २ वर

02 TO 08 OCTOBER 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 9/30/2023 8:29 PM Page 1



पान १ वरून...

## दारूच्या व्यसनापाई आईचे हाल...

घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. संजय निधेकर असं मृतक वडिलांचे नाव असून साहिल असं आरोपी मुलाचे नाव आहे. पोलिसांनी या प्रकरणी मुलाला अटक केली आहे. गुरुवारी रात्री ही घटना घडली आहे. मृतक संजय याला दारूचे व्यसन होते. कुठलंही काम न करता संजय हा पत्नीला दारू पिऊन मारहाण करायचा. घटनेच्या दिवशीही संजय हा दारू पिऊन आला होता. त्यानंतर त्याने पिंकी निधेकरला मारहाण करण्यास सुरुवात झाली. त्यातूनच त्यांच्यात मोठे वाद झाले. मुलगा साहिलला याची माहिती मिळाली होती. त्याने आईला त्याच्या आजीच्या घरी सोडले आणि वडिलांना शोधण्यासाठी निघाला. साहिलने रागाच्या भरात असतानाच त्याला वडिल विवेकानंद चौकात असल्याची माहिती मिळाली. वडिलांना दारूच्या नशेत पाहताच त्यांनी धारदार शस्त्राने वार करत त्यांच्या खून केला आणि घटनास्थळावरुन पसार झाला. संजय हा रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून येताच काहींनी त्याला रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरू असतानाच त्याच्या मृत्यू झाला. त्यानंतर कुटुंबीयांना आणि पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली. पोलिसांनी याबाबत कसून चौकशी केली असता मोठा मुलगा साहिल यानेच वडिलांचा खून केल्याचे पोलिस तपासात उघडकीस आले आहे. त्यानंतर गुन्हे शाखेच्या युनिट १ ने मुलगा साहिलला अटक केली आहे. कळमना पोलीस स्टेशनच्या हद्दीत गणेशोत्सवानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात क्षुल्लक कारणातून तरुणाचा खून करणाऱ्या आरोपीस अटक करण्यात आली आहे. प्रेमचंद निषाद अस मृतकाचं नाव आहे. तर, भुपेंद्र बागमरिया असे मारेकऱ्या तरुणाचे नाव आहे. घटनेच्या एक दिवसापुर्वी गणपती कार्यक्रमात शाब्दिक वाद झाला होता. याचा समझोता करण्यासाठी प्रेमचंद हा भुपेंद्र यांच्या घरी गेला होता. त्यानंतर दोघांमधील वादाने टोक गाठले. यावेळी भुपेंद्रने चाकूने प्रेमचंदच्या शरीरावर गंभीररित्या वार केला. यात प्रेमचंदचा मृत्यू झाला. पोलिसांनी भुपेंद्र बागमरिया याला अटक केलीय.

## सहा महिन्यातच त्यांच्या प्रेम विवाहाची ...

विरोध होता. त्यातून पत्नी माहेरी निघून गेल्याने आशिषला प्रचंड राग होता. त्याच भांडणातून आशिषने गाढ झोपी गेलेल्या सासू आणि मेव्हण्याचा अंगावर पेट्रोल टाकून दोघांना जिवंत जाळले आहे. दोघांची राख झाल्यावर स्वतःवर पेट्रोल टाकून आत्महत्या केली आहे. पत्नी माहेरी आल्यानंतर आशिष वंडलीत येऊन त्रास देत होता. त्यामुळे लता भोंडे यांनी मुलीला मावशीकडे पाठवले. रविवारी आशिष मित्राच्या दुचाकीने वंडलीला आला होता. वाटेत गाडीत पेट्रोल भरताना त्याने काचेच्या बाटलीत शंभर रुपयांचे पेट्रोल विकत घेतले होते. सासूरवाडीला आल्यानंतर त्याने लता आणि प्रणयसोबत वाद घालण्यास सुरुवात केली आणि जीवे मारण्याची धमकीही दिली. त्यानंतर सोमवारी पहाटे तो परत आला. लता आणि प्रणयच्या अंगावर पेट्रोल टाकून पेटवून दिले. यानंतर आपणही आत्महत्या करत असल्याचे सांगत पेट्रोल स्वतःवर ओतून पेटवून घेत आत्महत्या केली.

## पैशांमुळे तुटते दोस्ती यारी...

रूग्णालयात पाठवून दिला. मयत तरूणाची ओळख पटल्यानंतर पोलीसांनी त्याचा खून कुणी आणि कशासाठी केला याचा तपास करायला सुरूवात केली. पिंपरी चिंचवड स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ट पोलीस निरी.संतोष पाटील यांनी मयत सचिन यादव याची माहिती गोळा करायला सुरूवात केली. त्याचे मित्र कोण आहेत. तो कोणाबरोबर कुठे फिरतो त्याला कुठले व्यसन होते का? याची माहिती पो.निरी.संतोष पाटील हे घेत असताना त्यानां माहिती मिळाली की, मयत सचिन यादव हा २४ सप्टेंबर रोजी पिंपरी चिंचवड एमआयडीसी परिसरात त्याच्या दोन मित्रासोबत फिरत होता. म्हणून पोलीसांनी त्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पाहणी केली. त्यात एका कॅमेऱ्यात सचिन यादव हा त्याचे मित्र रोहित नागवसे आणि गोरख फल्ले हे त्याच्याबरोबर फिरत होते. ते दोघे ही सचिन बेपत्ता झाल्यापासून गायब होते. पोलीसांनी या दोघांची माहिती घेतली असता रोहित नागवसे हा बीड जिल्यातील आपल्या गावी गेला असून तो तेथे राहत आहे. तर गोरख फल्ले हा सचिन याचा खून करून आपली ओळख लपवून मुंबईतील विरार परिसरातील आपल्या एका तृत्तीय पंथीय मित्राच्या घरी तृत्तीयपंथीय बनून राहत आहे.तो तृत्तीय पंथीय बनून त्याने आपले नाव गायत्री असे धारण केले आहे. या माहिती वरून पोलीसांच्या एका पथकाने मुंबईतील विरार परिसरातून गायत्री बनलेल्या गोरख याला ताब्यात घेतले. तो चक्क तृत्तीयपंथीयाच्या वेशात होता.पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन पिंपरी चिंचवड पोलीस ठाण्यात आणून त्याच्याकडे सचिन यादव याची चौकशी केली असता तो पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून सचिन यादव याचा खुन का? आणि कशासाठी केला याची माहिती दिली. सचिन यादव हा त्याचा मित्र होता. तो आणि रोहित नागवसे हे दोघे सचिन यादव याला कधी कधी दारू पिण्यासाठी बोलावून घेत होते. या दोघांना सचिन हा श्रीमंत असल्याची माहिती होती. त्याच्याकडे पैसा आडका ही भरपुर आहे हे ही त्यांना माहित होते. गोरख फल्ले आणि रोहित नागवसे हे दोघे ही वाईट मित्रांच्या संगतीला लागून कर्जबाजारी झालेले होते. त्या दोघांच्या अंगावर जवळपास पाच सहा लाख रूपयाचे कर्ज होते. त्याच्या हातून त्याचे कर्ज फिटत नव्हते. त्या दोघांच्या मागे कर्ज देणाऱ्यांचा ससेमिरा लागलेला होता. आपले हे कर्ज कसे भागवायचे या विचारात असताना त्या दोघांनी विचार केला की आपला श्रीमंत मित्र सचिन यादव याचे कडून काही रक्कम उसणे घ्यायचे.त्याने उसणे पैसे दिले नाही तर त्याचा गेम करायचा. त्या दोघांनी तसा विचार करून सचिन यादव याला दि.२४ सप्टेंबर रोजी त्याच्या मोबाईलवर फोन केला. त्यावेळी दुपारचे ४ वाजले होते. गोरख फल्ले याचा फोन आल्याने सचिन यादव हा घरातून कोणाला काही न सांगता बाहेर पडला.ते तिघे ही त्यावेळी पिंपरी चिंचवड एमआयडीसी परिसरातून फिरत होते. गोरख याने सचिनला दारू पिण्यासाठी जावू या का? असे विचारले.सचिन ही तयार झाला. ते तिघे ही निमगाव जंगलातील एका देवळाच्या पाठीमागे गेले. तेथे त्यांनी देवीचे दर्शन घेऊन देवळाच्या मागे लांब असणाऱ्या मोकळ्या जागेत गेले. मोकळ्या जागेत ते तिघे ही दारू पित बसले असताना गोरख याने सचिन यादवकडे उसणे दोन लाख रूपये मागितले. आमच्या दोघांचे कर्ज जास्त झाले आहे. ते कर्ज भागविण्यासाठी आम्हाला पैशाची गरज आहे. तु थोडी रक्कम आम्हाला उसणे दे. यावर सचिन याने त्यांना माझ्याकडे एवढी मोठी रक्कम नाही. मी तुम्हाला पैसे देऊ शकत नाही. मला तुम्ही माफ करा असे बोलला. सचिनकडे पैसे असून पैसे देत नाही याचा राग गोरख आणि रोहितला आला. त्यावेळी त्यांनी मुद्दामच सचिन याला भरपुर दारू पाजली. दारूच्या नशेत तो असताना त्या दोघांनी त्याला मारहाण करायला सुरूवात केली. ते त्याला लाथा बुक्कयांनी मारहाण करीत असताना त्यांनी त्याला खाली पाडले. त्यावेळी दारूच्या नशेत असणाऱ्या गोरख याने बाजुलाच पडलेला मोठा दगड उचलला आणि खाली पडलेल्या सचिनच्या डोक्यात जोरात घातला. त्यासरशी त्याचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. तो ओरडत टाचा घासत होता.काही क्षणातच त्याचा जागीच त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याचा खून करून ते दोघे तेथून निघून गेले. त्याचा खून कसा पचवायचा या विचारात असताना रोहित हा बीड जिल्हयातील आपल्या मुळ गावी गेला. तर गोरख हाा मुंबईतील आपल्या तृत्तीय पंथीय मित्राकडे गेला. मुंबईतील त्याचा मित्र हा विरार भागात राहत होता. त्याचेकडे गोरख हा तृत्तीयपंथीय बनून राहू लागला. त्याने तृत्तीयपंथीय बनून आपले नाव गायत्री नाव धारण केले. तो तृत्तींयपंथीय बनून राहत असल्याने त्याला तेथे सहसा कुणी ओळखत नव्हते. त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याचा दुसरा मित्र रोहित नागवसे याला बीड जिल्हयातून त्याच्या मुळ गावातून ताब्यात घेतले. त्याला पिंपरी चिंचवड पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे सचिन यादवच्या खूनाविषयी चौकशी केला असता त्याने ही आपला गुन्हा कबुल केला. त्या दोघांनी आपला गुन्हा कबुल केल्यानंतर पोलीसांनी मयत सचिन यादव याचे वडिल हरिराम यादव याच्याकडून फिर्याद लिहून घेतली.त्यांनी दिलेल्यार फिर्यादीवरून पोलीसांनी सचिन हरिराम यादव (वय १९) याच्या खून प्रकरणी गोरख फल्ले (वय २२) आणि रोहित नागवसे (वय २१) याच्या विरोधात भा.दं.वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्या दोघांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा तपास पिंपरी चिंचवड पोलीसाबरोबर म्हाळंगे पोलीस करीत आहेत. आरोपी कितीही शातीर आणि सजग असले तरी पोलीस त्याच्या पुढे दोन पावले असतात.

## दारूमुळेच सख्खा भाऊ पक्का वैरी ...

काढत होता. त्याचा लहान भाऊ दत्तात्रय हा देखील दारू पित होता. तो देखील घरात दारू पिऊन आला की,काही ना काही कारण उकरून भांडण काढत असल्याने घरात नेहमी दोन भावात मारामारी, भांडणे ही ठरलेलीच होती. नांद्रे येथील कुंभार गल्लीत ते राहयला असल्याने आजुबाजू राहणाऱ्या भावकीतील लोकांना त्याच्या भांडणाचा त्रास हा होत होता. त्याचे वडिल प्रकाश आणि चंपाबाई हे दोघे ही मुलांच्या भांडणाला कंटाळलेले होते. राहुल आणि दत्तात्रय हे दोघे ही सेट्रींगचे काम करीत असल्याने सकाळी कामावर गेले की संध्याकाळी परत घराकडे येत होते. कामावरून घराकडे येत असताना ते दोघे ही आपल्या घशाखाली दारू रिचवून येत होते. सेट्रींगच्या कामातून मिळणाऱ्या पैशातून ते दोघे दारू पित असल्याने घरात घरखर्चाला ते दोघे ही पैसे देत नव्हते. त्यामुळे आई वडिलांचे हाल होत होते. त्यांनी बऱ्याच वेळेला दोघांना समजावून सांगितले तरी दोघे ही कुणाचे ऐकत नव्हते. त्यातच बायको भांडण काढून तिच्या माहेरी राहत असल्याने राहूल हा कायम त्रस्त झालेला होता. तो घरात घर खर्चाला काहीच पैसे देत नव्हता. उलट तो आई वडिलांना तुमच्या त्रासामुळे माझी बायको भांडून गेली आहे, तिला तुम्ही आणा जावा असे सांगत होता. खरे तर त्याची बायको ही तो सारखा दारू पिऊन तिला शिवीगाळ करून मारहाण करीत असल्याने भांडून गेली होती परंतु आपले खापर तो घरातील आई वडिल आणि भावावर फोडत होता. घरात काय आहे, काय नाही याचे त्याला सोयर सुतक नव्हते. तो मोठा असून घरात घरखर्चाला पैसे देत नाही म्हणून लहान असणारा दत्ताही घरखर्चाला पैसे देत नव्हता. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. दोघा भावांच्या वादात त्याचे आई वडिल हे कुंभार गल्लीतच दुसरीकडे भाडयाने खोली करून राहू लागले होते. त्यामुळे त्या दोघांचे जास्तच फावले होते.घरात विचारणारे कुणी नाही म्हणातच दोघे ही रात्री टल्ल्या होऊन ऐकमेकाला शिवीगाळ करीत ऐकमेकांच्या अंगावर जात होते.दोघांची भांडणे सोडवे पर्यत शेजारील लोकांना नाकी नऊ येत होते. त्यांनी ही त्यांना बऱ्याचवेळेला समजावून सांगितले परंतु त्याचे सांगणे हे त्याच्या दृष्टीने पालथ्या घडयावरचे पाणी होते. दोघांच्या भांडणात त्याच्या आई वडिलांचे हाल होत होते. या वयात दोघांना ही दुसरीकडे कामाला जावे लागत होते. दोन मुले असून ही त्याचा काही उपयोग नव्हता. त्यामुळे ते ही वैतागून आपल्या कर्माला दोष देत कसे तरी दिवस ढकलत होते. बऱ्याच वेळेला दोघांच्या भांडणात त्यांनी पडून मार ही खाल्ला होता. दोन मुले असल्याने आपल्याला सुखाचे दिवस येतील अशी त्याची अपेक्षा होती. परंतु दोघांच्या भांडणात त्यांनाच वेगळे भाडयान राहयला लागल्याने दोघांची ही गोची होत होती.परिणामी त्याची पै-पाहुण्यात आणि भावकीत अब्रु गेली होती.दारूची नशा ही करी ही जीवनाची दुर्दशा असे म्हटले जाते. दारूमुळे कधी कोणाचे चांगले झाले नाही.उलट दारूच्या नशेत अनेक कुंटूंबे बरबाद झाली.तसेच राहुलचे ही झाले होते. तो दारू पिऊन घरात भांडण तंटा काढत असल्याने आणि बायकोला मारहाण करीत असल्याने त्याची बायको त्याला सोडून गेली होती. तरी ही तो काही शहाणा होत नव्हता. त्याचे कधी त्याच्या बायकोशी पटले, ना भावाशी, ना आई वडिलाशी,त्यातूनच तो जास्तच दारू पिऊ लागला होता. दोघांच्या दारू पिण्याच्या व्यसनामुळे घरातील वातावरण बिघडले होते. आई वडिल त्याच्या त्रासाला कंटाळून वेगळे राहत होते. त्यामुळे घरात काही राम नव्हता.घराचे घरपणच गेले होते.तरी ही राहुल आणि दत्तात्रय हे जास्तच दारू पित होते.दारूच्या नशेत भांडण काढून ऐकमेकांना मारहाण करणे एवढेच त्यांना माहित होते. भांडणात ते दोघे ही तु का घरात घरखर्चाला पैसे देत नाहीस यावरून भांडणे होत होती. राहुल तर बायको भांडण काढून माहेरी गेली असल्याने तो आपल्या आई वडिलांना शिवीगाळ करून मारहाण करीत होता याचा राग दत्तात्रय याला येत होता. तु मोठा आहेस तु घरात घरखर्चाला पैसे दे असे त्याचे म्हणणे होते. गुरूवार दि.२८ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी आणि इर्द-ए-मिलाद असल्याने त्या दोघांनी ही कामावर सुट्टी घेतली होती. सकाळ पासूनच ते दोघे ही दारू पिऊन टल्ल्या झाले होते. दिवसभर दारू प्यायचे घरात येऊन ऐकमेकांना शिवीगाळ करीत बसायचे एवढेच त्याचे काम होते. रात्री ९ नंतर तर त्या दोघांनी ही फुल्ल दारू पिली होती. दोघे ही ऐकमेकांचा उद्दार करीत शिवीगाळ करीत होते.अशातच दत्तात्रय याने राहुल यास तु दारू पिऊन आईला का शिवीगाळ करतोस म्हणून विचारले. याचा राग राहुलला आला. त्याने त्याला म्हटले तु घरात घरखर्चाला पैसे देत नाहीस म्हणून आई वडिल घरातून बाहेर गेले आहेत. दोघात तू तू मै मै सुरू झाली. दोघे ही दारूच्या नशेत शिवीगाळ करीत ऐकमेकांच्या अंगावर जावू लागले. दत्ताने राहूलला खाली पाडले. रात्रीचे १० वाजून गेले होते. दोघांची भांडणे ही नेहमीचीच आहेत म्हणून शेजाऱ्यांनी ही यावेळी लक्ष दिले नाही. दोघात भांडणे वाढली होती. कुणीच त्याचे भांडण सोडवायला आले नाही. दोघे ही कधी कन्नड मध्ये तर कधी मराठीत ऐकमेकांना शिव्या देत होते. खाली पडलेला राहूल कसा तरी उठला होता. तो परत दत्ताच्या अगांवर मारायला गेल्यावर बाजुलाच पडलेली लाकडी काठी दत्ताने उचलली आणि राहुलला मारायला गेला. तो आपल्याला मारत आहे म्हटल्यावर रागाने लालबुंद झालेल्या राहुलने त्याच्याकडून काठी हिसकावून घेतली. आणि त्याच काठीने दत्ताला मारायला सुरूवात केली. तो खाली पडून ओरडू लागला होता. काठीच्या मारहाणीने त्याच्या अंगावर वळ उठले होते. कुंभार गल्लीत एकच गोंधळ उडला होता. राहुल त्याला मारत असताना दत्ताच्या तोंडून रक्त येत होते.त्यातच खाली पडलेल्या दत्ताच्या डोक्यात राहूलने लोंखडी कोयत्याने वार केले. त्यासरशी त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाला.घरात दोन मुलात भांडणे आणि मारामारी सुरू असल्याची माहिती मिळाल्यावर त्याचे आई वडिल ओरडतच घटनास्थळी आले. तो पर्यत दत्ता हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता.तर घरात दारूच्या नशेत राहुल हा थांबला होता. आपला लहान मुलगा दत्ता हा रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याने चंपाबाई यांनी आरडा ओरडा करायला सुरूवात केली. त्याच्या ओरडण्याने गल्लीतील भावकी जमा झाली.त्यांनी जखमी दत्ताला एका खाजगी गाडीत घालून सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आणले. परंतु तेथे पोहचण्यापूर्वीच वाटेतच त्याचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले. ही घटना घडली त्यावेळी बाजूच्या बुधगाव येथे गणेशउत्वानिमित्य बंदोबस्तासाठी पोलीस उपाधिक्षक आण्णासाहेब जाधव, पो.निरी शिवाजी गायकवाड, सपोनि सुशांत पाटील, पो.निरी. स्मिता पाटील हे होते. त्यांना या घटनेची माहिती समजाताच त्यांनी तातडीने नांद्रे येथील घटनास्थळ गाठले. त्यांनी या घटनेची माहित मयत दत्तात्रय कुंभार याचे वडिल प्रकाश कुंभार याचे कडून घेतली. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे. आणि यातील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्येच मयताचे शवविच्छेदन केले. या घटनेतील संशयीत आरोपी राहुल कुंभार हा घरातच असल्याने पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याला सांगली ग्रामीण पोलीस ठाण्यात आणले. तो पुर्ण दारूच्या नशेत असल्याने त्यावेळी पोलीसांनी त्याचेकडे काही या घटनेची त्यावेळी चौकशी केली नाही.दुसऱ्या दिवशी सकाळी ज्यावेळी त्याची दारूची नशा उतरली त्यावेळी त्याचेकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता त्याने कोणते ही आढेवेढे न घेता आपला गुन्हा कबुल केला. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची लेखी फिर्याद मयत आणि आरोपी याचे वडिल प्रकाश कुंभार याचे कडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दत्तात्रय प्रकाश कुंभार (वय ३०) रा.नांद्रे.ता. मिरज याच्या खून प्रकरणी त्याचा मोठा भाऊ राहुल उर्फ बसवेश्वर प्रकाश कुंभार (वय ३२) रा.नांद्रे ता.मिरज याच्या विरोधात भादंवि कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला सांगली येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने राहुल उर्फ बसवेश्वर प्रकाश कुंभार याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान त्याचेकडून गुन्हयात वापरलेली लाकडी काठी आणि कोयता पोलीसांनी जप्त केला. या घटनेचा पुढील पो.उपनिरीक्षक स्मिता पाटील आणि त्याचे सहकारी करीत आहेत.

## शुल्लक वादातून टिकम सिंग चिडला...

जखमी अवस्थेत पडलेला असून त्याचे कानातून, नाकातून खुप रक्तस्त्राव होत आहे, असे सांगितले. त्यामुळे मांगीलाल चौधरी याने तात्काळ त्याच्या सोबत राहणार देवसिंग यास बोलावून घेतले. तो रात्रपाळी कामावरून आल्यावर देविसिंग सह मांगीलाल हा वांद्रे टर्मिनस रेल्वे स्थानक फलाट क्र १ वर खार बाजूकडे गेल असता, विक्रमसिंग हा जखमी अवस्थेत लाकडी हातगाडीवर निपचीत पडलेला दिसला. त्याच्या नाकातून, कानातून व तोंडातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. त्यादरम्यान तेथे कर्तव्यावरील रेल्वे पोलीस व आर.पी.एफ.चे कर्मचारी होते. तेथील पोलीसांना त्याने विक्रम सिंग याची ओळख सांगून तो माझे सोबत राहत असल्याचे सांगितले. स्टेशन मास्तर, वांद्रे टर्मिनस रेल्वे स्थानक यांनी रेल्वे पोलीसांना विक्रम सिंग यास पुढील उपचारकामी भाभा हॉस्पिटल येथे घेवून जाणेबाबत लेखी मेमो दिला. त्यानुसार पोलीस त्यास उपचारकामी भाभा हॉस्पिटल, वांद्रे पश्चिम येथे घेवून गेले. त्यानंतर मांगीलाल हा काही वेळाने भाभा हॉस्पिटल येथे गेला असता, तेथे असलेले पो.ना. मोकळ यांनी जखमी विक्रम सिंग यास उपचारकामी दाखल करण्यापुर्वीच वैदयकीय अधिकाऱ्यांनी त्यास ९.५० वाजता मृत झाल्याचे घोषित केले,असे मांगीलाल यास पोलिसांनी सांगितले. तेव्हा विक्रम सिंग याचा मृतदेह पाहता त्याच्या कानाची पाळी फाटलेली असून कानाचे मागे जखम असल्याचे व कानातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होत असल्याचे तसेच दोन्ही डोळे सुजलेले असून ते निळे पडलेले असल्याचे दिसून आले. पोलीसांनी विक्रम सिंग याचेवर मरणोत्तर पंचनामा व इतर कागदोपत्री कार्यवाही केली असून त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कुपर हॉस्पिटल, जुहू येथे पाठवण्यात आला. दरम्यान मांगीलाल चौधरी याने ही माहिती विक्रम सिंग याचा भाऊ नरेंद्र मोहन सिंग यास मोबाईल फोन करून सांगितली. इकडे विक्रम सिंग यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने, अज्ञात कारणावरून त्याच्या डाव्या कानावर व दोन्ही डोळ्यांवर कोणत्यातरी टणक वस्तुने जबर प्रहार करून त्यास जीवे ठार मारले म्हणून मांगीलाल चौधरी याच्या फिर्यादी वरून वांद्रे लोहमार्ग पोलीस ठाण्यात गु. र.क्र.६४०/२०२३ कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्हयाचा तपास मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र शिसवे, पोलीस उपायुक्त मनोज पाटील, संदिप भाजीभाकरे, सहाय्यक पोलीस आयुक्त बाजीराव महाजन, सतीश चिंचकर, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशुद्दीन शेख व बांद्रा रेल्वे पोलीस ठाणे लोहमार्गचे पोलीस निरीक्षक, रविंद्र शिवरामवार हे तपास करीत होते.लोहमार्ग गुन्हे शाखेचे सपोनि हेमराज साठे, पो.हवा महेश सुर्वे, सोमनाथ गायकवाड व बांद्रा रेल्वे पोलीस ठाण्याचे सपोनि प्रमोद हावळे, पो.हवा मोरे, बिडगर यांचे संयुक्तकरित्या एक पथक तयार करण्यात आली .हे पथक आरोपीचा शोध घेण्यासाठी मध्यप्रदेश येथील उज्जैन येथे रवाना झाले. पटुनियाखेता, जिल्हा उज्जैन येथे पाठविण्यात आलेल्या पथकाने बातमीदार मार्फत माहिती काढून व तांत्रिकदृष्ट्या तपास करून गुन्हयातील आरोपी टिकम सिंह भगवान सिंह धनवार (३४) रा.ग्राम पटुनियाखेता खरसोदकला, जि. उज्जैन, (राज्य मध्यप्रदेश) यास त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली, ती अशी. विक्रम सिंग यास जास्त दारू पिण्याची सवय असल्याने तो रात्रीच्या वेळी वांद्रे टर्मिनस रेल्वे फलाटावर जात असे. तीन चार दिवसांपूर्वी विक्रम सिंग याने आरोपी टिकम सिंह भगवान सिंह धनवार यास मारहाण केली होती. तो राग त्याच्या डोक्यात होता. विक्रम सिंगकडून झालेल्या मारहाणीचा राग मनात ठेवून त्याचा सुडभावनेने बदला घेण्यासाठी टिकम सिंह व भगवान सिंह धनवार याने घटनेच्या दिवशी विक्रम यास गाठून त्यास मारहाण केली. यात तो गंभीर जखमी झाला. जखमी अवस्थेत रुग्णालयात नेण्यापूर्वी डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. याप्रकरणी आरोपी टिकम सिंह भगवान सिंह धनवार याला लोहमार्ग पोलिसांनी २१ सप्टेंबर रोजी अटक करून त्याच्या विरुद्ध वांद्रे रेल्वे पोलीस ठाण्यात गुरनं. १४०/ २०२३ कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. ही कामगिरी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशुद्दीन शेख, वांद्रे लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र शिवरामवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमराज साठे, सपोनि प्रमोद हावळे, पोउपनि. दिपक शिंदे तसेच पोलीस अंमलदार ए एस आय रविंद्र दरेकर, पोहवा महेश सुर्वे, पोहवा सोमनाथ गायकवाड, पोना महेश काळे, पोहवा वैभव शिंदे, पोना सत्यजित कांबळे, पोना अमरसिंग वळवी, पोहवा प्रशांत साळुके, पोशि अक्षय देसाई, पोशि सुनिल मांगडे ,गुन्हे शाखा युनिट क्र. ६ बांद्रा लोहमार्ग मुंबई व पोलीस अंमलदार सपोफौ नितीन चव्हाण, मसपोफौ गुलशन पठाण, सपोफौ अनिल सादिगले, सपोफौ सैफुद्दीन मोमीन, पोहवा सुदाम भोजणे, पोहवा सुरेन्द्र मोरे, पोहवा नारायण बिडगर, धनसिंग चव्हाण, सुभाष पडवळ, पोना रमेश सावंत, सैपनसाव नदाफ, पोशि दिलीप पवार, रियाज तांबोळी, सुरेश जाधव, सचिन शिंदे, सुलेमान परकोटे, अतुल शेडगे, आकाश काकडे, विकास आरकड, विक्रांत कुंभार, अमीत वाघमोडे इत्यादि पार पाडली.

## बापावर वार करताच थोरला चिडला...

प्रकारच्या नशा करत असतो. तो सतत नशेत असतो, शिवाय नशेत तो परिसरातील आणि घरातील लोकांना शिवीगाळ, दमबाजी व मारहाण करून सतत त्रास द्यायचा. काहीही उद्योग तो करून ठेवायचा त्यामुळे त्याला सर्व जण वैतागले होते. तो घराबाहेर जावून कोणाला त्रास देवू नये म्हणून कधी-कधी त्याला घरातच साखळीने बांधून ठेवावे लागत होते. इतका तो सर्वांना त्रासदायक ठरला होता. दि. ९ सप्टेंबर २०२३ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास जाविद यास घरातच साखळीने बांधून ठेवले होते, मात्र तो आकांडतांडव व आरडाओरडा करून घराबाहेर जाण्याचा हट्ट करत होता. अखेर त्यानेच स्वतःला बांधलेली साखळी सोडवली आणि घराबाहेर जाण्याकरता हट्ट करू लागला, तेंव्हा जमिल अहमद व त्यांची पत्नी तस्लीमा हे त्याला 'तू बाहर मत जा, घर में रुक' असे समजावून सांगू लागले, पण तो काही कोणाला ऐकणारा नव्हता. समजावून सांगणाऱ्या आई-बापांना जोरात धक्का देऊन तो बाहेर जाण्याचा प्रयत्न करू लागला, पण त्यांनी त्याला घट्ट धरले होते तरीही तो घराबाहेर जाण्यासाठी आई- वडीलांना पक्के मारू लागला. यावेळी त्याचा मोठा भाऊ मुद्दसीर अहमद (वय २५) हा घरी आला. त्याने जाविद हा आई-वडीलांना जोरजोरात धके मारून बाहेर जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे पाहिले, बाहेर जाऊन कोणाला त्रास देऊ नये, कोणाशी काही तंटा करू नये म्हणून आई- वडील त्याला समजावत होते. अडवत होते तो मात्र समजून न घेता त्यांनाच धक्के देत असल्याने मुद्दसीरला भयंकर राग आला. त्याने जाविदला विचारणा केला, 'तू अम्मी और अब्बू को धक्का क्यूं मारा?' यावेळी दोघांमध्ये बाचाबाची होवून भांडण सुरू झाले. मुदसीर चिडला होता. तो जाविदला गप्प बसवण्यासाठी हाताने चापटी मारू लागला, तेव्हा जाविदला त्याचा राग आला. जाविदने त्याच्या खिशातील चाकू बाहेर काढून मुहसीर याच्यावर वार करण्याचा प्रयत्न केला, मात्र तो बार मुद्दसीरने चुकवला. जाविद मोठ्या भावाला मारहाण करत होता, त्याला मुद्दसीरही प्रत्युत्तर देत होता. दोघांचे भांडण वाढत चालल्याचे पाहून वडील जमिल अहमद त्यांचे भांडण सोडवण्याचा प्रयत्न करू लागले. दरम्यान जाविद हा मुद्दसीर याच्यावर चाकूने वार करतांना तो वार जमिल अहमद यांच्या डाव्या दंडावर लागला. खोलवर वार होऊन ते जखमी झाले, त्यांच्या दंडातून रक्तस्त्राव होवू लागला. हे पाहून मुहसीरचा राग अनावर झाला. जाविदने चाकूने वार करून वडीलांना जखमी केल्याचे मुद्दसीरला सहन झाले नाही. त्याने चिडून जाऊन जावीदच्या हातातील चाकू हिसकावला. तुने अब्बु को चाकू क्यु मारा? तेरा हमेशा का नाटक हो गया है. तेरा आज खेल खत्म करता हू असे म्हणत त्याने जावीदच्या डाव्या छातीवर धारदार चाकूने वार केला. तो घाव वर्मी बसल्याने जाविदच्या छातीतून रक्तस्त्राव होऊ लागला. त्याचवेळी वसीम हा घरी आला. त्याने आणि मुदस्सीर या दोघांनी जखमी जाविद आणि जमिल अहमद या दोघांना रिक्षात टाकून फरान हॉस्पीटल येथे आणले. उपचार सुरु असतांनाच जाविदचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळ अप्पर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती, उपअधीक्षक पुष्कराज सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक प्रशांत अहिरे व सहाय्यक पोलीस निरीक्षक जे.जी. बोरसे यांनी घटनास्थळी धाव घेतली व घटनेची माहिती घेतली. जाविद याने बापाला चाकूने वार करून जखमी केले. याचा राग आल्याने मुद्दसीर याने त्याच्या हातातील चाकू हिसकावून जाविदवर वार करून त्याला ठार मारले. त्यानुसार मुद्दसौर विरोधात बापाला पोलीस ठाण्यात फिर्याद द्यावी लागली. जमिल अहमद मोहमद असगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुलगा मुद्दसीर अहमद जमिल अहमद याच्यावर आयेशानगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं.१०१/२०२३ नुसार भा.दं.वि. ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मुद्दसीर स्वतःहून पोलीस ठाण्यात हजर झाला. पोलिसांनी त्याला अटक केली. सतत भांडण करून त्रास देतो आणि बापावर चाकूने वार केल्याने मुद्दसीर याच्या हातून लहान भावाचा खून झाला. आयेशानगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अहिरे या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

## मुलाची गावात गुंडागर्दी वाढताच भारी...

सोमवारी त्यांनी वसंत आव्हाड याच्या बँक खात्यावर वीस हजार रुपये ऑनलाईन ट्रान्सफर केले व पन्नास हजार रुपये रोख दिले होते. पोलिसांच्या तांत्रिक विश्लेषणात वसंत आव्हाड याने दारू पिण्याच्या पाहण्याने राहुलला बंद पडलेल्या कंपनीकडे नेल्याचे निष्पन्न झाले होते. तेथे विकास देखिल होता. तिघांनी मद्यपान केल्यावर कमरेच्या पट्ट्याने गळा आवळून राहुलचा खून केला व दोघेही पळून गेले. वडील शिवाजी आव्हाड यांनीच मुलाच्या कुणाची कबुली दिल्यावर सिन्नर पोलिसांनी तिघांना अटक केली. उपनिरीक्षक आजिनाथ कोठाळे पुढील तपास करत आहेत. राहुलने शनिवारी मद्यपान करून घरी आल्यावर आई-वडिलांना मारहाण केली होती. त्यावेळी त्याच्या आईला सोडवण्यासाठी मध्ये पडलेल्या शेजारच्या महिलेवर देखील हल्ला करून त्याने तिला गंभीर जखमी केले होते. सदर महिलेच्या डोक्यात दगड घातल्याने ती कोमामध्ये आहे. या प्रकरणानंतर वडील शिवाजी अव्हाड यांनी सिन्नर पोलीस ठाण्यात मुलाविरुद्ध तक्रार दिली होती. त्याला शोधण्यासाठी गावात आलेल्या पोलिसाना बघून राहुल परागंदा झाला होता. राहुलच्या त्रासामुळे गावात नेहमीच खाली पहावे लागत असल्याने शिवाजी आव्हाड यांनी आपल्या मित्रांना विश्वासात घेऊन त्यांनाच ७० हजार रुपये सुपारी देऊन त्याचा काटा काढण्यास सांगितले होते.

# जव्हार-वाळवंडा घाटमार्ग धोकादायक, वळणावरील रस्ता खचत असल्याने रस्ता ढासळण्याच्या परिस्थितीत!

**पालघर/एच. लोखंडे**

जव्हार मोखाडा मधील लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकारीं यांच्या दुर्लक्ष्या मुळे वाळवंडा गावापासून ते जव्हार मार्गावर एक ते दीड किलोमीटर अंतरावर घाट वळणावर रस्त्याची साईड पट्टी खचत असल्याने एकाबाजूला महाकाय खड्डा निर्माण झाला आहे .त्यामुळे जव्हार ला जाणारा घाटमार्ग अतिशय धोकादायक बनला आहे. यामुळे या रस्त्याने प्रवास करणारे, वाहतूक करणे यांना आपला जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे, जव्हार तालुक्यातील अनेक लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी वेळोवेळी याच मार्गे प्रवास करीत असुन सुद्धा, वळणा वरील रस्ता खचत असल्याने, परिस्थिती धोकादायक होते असूनही, सदर बाब. लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या लक्षात येत नसल्याने नाटक करित आहे, की एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहेत का अशा चर्चा सदर भागातून प्रवास करणारे प्रवासी व नागरिकांन मध्ये सुरु आहे. महिना भरापासून सुरू असलेल्या पावसामुळे, जव्हार



घाटातील वळण रस्ता खचण्यास सुरुवात झाली आहे. वळण रस्त्याच्या एका बाजूला खोल दरी आहे. रस्त्याच्या एका बाजूने उतार असल्याने वाहने ही वेगाने खाली येत असुन वाहनचालकाला पुढील वळणाची कल्पना नसते. या मार्गावर नव्याने येणाऱ्या गाडी चालकांना वेगाचा अंदाज येत नाही, त्यामुळे आगामी काळात जर निरंतर पाऊस झाल्यास सर्व रस्ता खचू शकतो. त्यासाठी तत्काळ प्रतिबंधक उपाय योजना करण्याची गरज आहे. अन्यथा या मार्गाची माहिती नसलेले वाहन चालक, खचत असलेल्या रोड च्या साईड पट्टी वरून गेल्यास कदाचित मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर खचत असलेल्या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करून, रस्त्याच्या दुतर्फा संरक्षक भिंत बांधणे गरजेचे आहे. किंवा दरीच्या बाजूला संरक्षित भिंत बांधणे शक्य झाले नाही तर किमान चार फुटांपर्यंत उंच कठडे बांधणे आवश्यक आहे. जव्हार वरून विक्रमगड च्या दिशेने जाणारे वाहन हे रस्त्याला उतार असल्यामुळे कदाचित चालकांचा ताबा सुटल्यास किंवा पावसामुळे वाहन घसरल्यास ते थेट दरीत कोसळणार नाही व जीवितहानी टाळता येईल. यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी यांना तातडीने लक्ष देण्यास वेळ मिळणार आहे की, वराती मागून घोडे धावणार या बद्दल सर्वत्र चर्चा होत असली तरी लालफितीत अडकलेल्या प्रशासकीय अधिकारी यांना कधी जाग येणार?

# भिवंडी शहरात मोफत कृत्रिम पाय वितरण शिबिर संपन्न, ५५ दिव्यांगांनी घेतला लाभ



**भिवंडी/प्रतिनिधी**

श्री हलारी विशा ओसवाल समाज मुंबई यांच्यातर्फे भिवंडीत प्रभा फूट या संस्थेच्या मार्फत कृत्रिम पाय वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल ५५ गरजू दिव्यांग नागरिकांना अंजुरफाटा येथील ओसवाल सागर बिल्डिंग येथे या कृत्रिम पाय वितरण करण्यात आले आहे. गोमा इंजिनिअरिंग प्रा ली चे केशवजी मेघजी गोसराणी यांच्या सहकार्यातून या सर्व दिव्यांगांना हे कृत्रिम पाय भेट देण्यात आले. कृत्रिम पाय लावून त्याचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांकडून दिले गेले. त्यानंतर अनेकांनी चालण्याचा सराव केला.या शिबिरात संगमनेर, नाशिक पूणा, भिवंडी, हैद्राबाद, तेलंगणा येथून दिव्यांग आले होते. विशेषत: हे कृत्रिम पाय हलके असल्याने वापरण्यास सहज शक्य असून ते घुडघ्या मधून वाकतात, त्यामध्ये खाली बसता येते त्यामुळे या कृत्रिम पायांना पसंती दिली जाते. हे कृत्रिम पाय बसविल्या नंतर अनेक दिव्यांगांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी श्री हलारी विशा ओसवाल समाजाचे भिवंडी शहरातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी विशेष मेहनत घेतली.

# ग्रीको रोमन कुस्तीप्रकारात हर्षित झेंडे प्रथम

**जळगाव/प्रतिनिधी**



येवला येथे विभागीय कुस्ती स्पर्धा दि. २३ ला पार पडली. या स्पर्धेत प्रगती विद्या मंदीर शाळेचा विद्यार्थी व शाहुनगरमधील हनुमान आखाडा व्यायामशाळेचा पैलवान चि. हर्षित मनिष झेंडे हा ७१ किलो वजनी गटात व ग्रीको रोमन या कुस्ती प्रकारात प्रथम क्रमांकाने विजयी झाला. या स्पर्धेच्या गटात प्रत्येकी दोन राऊंड झाले व दोन्ही राऊंड मध्ये हर्षित झेंडे या पैलवानने जिंकून अंतिम फेरीत विजय मिळवला. आता त्याची दि. २४ ते २७ दरम्यान कोल्हापूर येथे आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धा २०२३-२४ स्पर्धेसाठी निवड झाली असून तो त्या स्पर्धेसाठी कोल्हापूर येथे रवाना झाला आहे. जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. कंपनीच्या एक्सपोर्ट मार्केटिंग विभागाचे सहकारी मनिष झेंडे यांचा हर्षित चिरंजीव आहे. यशस्वी कामगिरीसाठी त्याला गुरु वस्ताद विजयदादा वाडकर, शाळेतील शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. भविष्यातील विजयी कारकीर्दीस त्याला कुटूंबिय, हनुमान आखाड्याचे विजयदादा वाडकर व समस्त पैलवान मित्रमंडळीतर्फे शाळेतील समस्त शिक्षकांतर्फे शुभेच्छा दिल्या आहेत.



**लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला मराठवाडा विभागातील सर्वोत्कृष्ट बँक म्हणून जाहीर झालेला दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसियशनच्या कै.वैकुंठभाई मेहता पुरस्कारमिळाल्या बद्धल लातूर जिल्हा मजूर सहकारी संस्था संघ म.लातूर च्या वतीने दिलीप पाटील नागराळकर यांच्या हस्ते माजी मंत्री दिलीपराव देशमुख व तसेच लातूर ग्रामीणचे युवा आमदार तथा जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासराव देशमुख यांचा संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

# शिंगडगाव येथे सासऱ्याला पेट्रोल ओतून पेटवले; मुंबईतून जावयाला घेतले ताब्यात



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिंगडगाव गावात सासऱ्याला शिवीगाळ, दमदाटी, मारहाण करून पेट्रोल ओतून चक्क जावयाने पेटवून दिले आणि त्यानंतर मुंबईला रवाना झाला. गिरगाव चौपाटी येथे पैसे घेऊन दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन करताना समुद्रकिनारी वळसंग पोलीस ठाण्याच्या पोलीस पथकाने त्याला जेरबंद केले. जावई करण शाम चव्हाण याने पत्नी विमल चव्हाण हिच्यासह सिंहगडगाव येथे येऊन सासरा शंकर जगलो पवार व सासू निर्मलाबाई पवार यांना शिवीगाळ दमदाटी करत सासऱ्याला मारहाणही केली. दरम्यान सासू निर्मलाबाई हिने असे तुमचे वागणे बरे नाही व त्यांना मारू नका असे म्हणत असताना आरोपी करण याने खिशात आणलेली पेट्रोलची बाटली सासऱ्याच्या अंगावर ओतून पेटवून दिले आगीचा भडका उडून सासरा विवळत असताना आणि त्याला वाचवण्याचा प्रयत्न सासू करत असताना काहीही दया माया न दाखवता जावई घटनास्थळावरून पळून गेला. पतीच्या या कृत्याला पाठबळ देत पोटच्या मुलीनेही आई-वडिलांची काळजी न करता पतीला पाठिंबा देत बाप मरू दे तो जिंदा रहता कामा नये असे म्हणत घटनास्थळावरून तीही पळून गेली. जखमी अवस्थेत पत्नी निर्मलाबाईने फिर्यादीला सोलापुरात उपचारासाठी दाखल केले. शिंगडगाव येथे ही घटना घडलेली होती. घटनेनंतर आरोपीने पत्नीला सोबत घेऊन मुंबई गाठला होता. या घटनेचा तपास करणाऱ्या टीमने, वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील, पोलीस अंमलदार श्रीशैल माळी, अनिसा पटेल यांनी मुंबई गाठले तो गिरगाव चौपाटी येथे दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन मजुरी घेऊन करत असल्याचे पोलीस पथकाला कळले पोलिसांनी त्यांच्यासोबत पत्नी विमल हिला ही ताब्यात घेतले आहे.

# फिट इंडिया क्युजचे आयोजन

**पालघर** : केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय, याच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विषयक सामान्य ज्ञान चाचणीचे आयोजन सन २०१९ पासून करण्यात येत आहे. सन २०२२ मध्ये Fit India Quiz 2 चे आयोजन करण्यात आले होते विद्यार्थ्यांना खेळाविषयक असलेले ज्ञान, कौशल्य इत्यादीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे. याचप्रमाणे केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय यांच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विषयक सामान्य ज्ञान चाचणीचे Fit India oouiz 3 चे आयोजन करण्यात येत आहे. Fit India Quiz 3 या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभागी होण्यासाठी. पुर्ण भारतभर यासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी ५ ऑक्टोबर २०२३ पर्यत करावी या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन विजेत्या खेळाडूंना खालील तक्त्यात पारितोषिक रचना देण्यात आले आहे. सर्व शाळा व विद्यार्थी nttps://fitindia.nta.ac.in/ या कार्यालयीन वेबसाईटवर त्यांच्या विद्यार्थ्यांची नोंदणी करू शकतात, शाळा व शिक्षक नोंदणी साठी शाळांनी सहकार्य करावे. Fit India quiz-2023 पारितोषिक रचना पुढील प्रमाणे: राष्ट्रीय चॅम्पियनसाठी शालेयासाठी रोख पारितोषिक २५,००,०००/- इतके आहे तर विद्यार्थ्यांसाठी रोख पारितोषिक २,५०,०००/- इतके आहे. प्रथम धावणारा अप-राष्ट्रीय गोल शालेयासाठी रोख पारितोषिक १५,००,०००/- इतके आहे तर विद्यार्थ्यांसाठी रोख पारितोषिक १,५०,०००/- इतके आहे. व्दितीय धावणारा अप-राष्ट्रीय गोल शालेयासाठी रोख पारितोषिक १०,००,०००/- इतके आहे तर विद्यार्थ्यांसाठी रोख पारितोषिक १,००,०००/- इतके आहे. तरी पालघर जिल्ह्यातील Fit India Quiz 3 या स्पर्धेमध्ये शाळा व महाविद्यालये यांना जास्त प्रमाणात सहभाग नोंदवावा असे आवाहन केले आहे.

# बाजार समिती सभापतींना विविध मागण्यांचे निवेदन

लातूर : भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडी शिवछत्रपती मार्केट यार्ड लातूरच्या वतीने उच्चतम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतींना विविध २७ महत्वपूर्ण प्रलंबित मागण्यांचे निवेदन देण्यात आले. सभापतींना देण्यात आलेल्या निवेदनात व्यापारी आघाडीच्या वतीने पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीचे नाव छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड असे आहे. त्यामुळे बाजार समिती कार्यालय परिसरात शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात यावा. मार्केट टॅक्स शेकडा ४० पैसे करण्यात यावा. महिला व पुरुषांकरिता सुसज्ज स्वच्छतागृहाची सोय करावी. शेतीमालाला भावांतर योजना चालू करावी. बाजार समिती आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. बाजार समितीतील प्रत्येक लाईनला ध्वनिक्षेपक यंत्रणा बसविण्यात यावी, चोऱ्यांचे प्रमाण रोखण्यासाठी प्रत्येक लाईनला दोन सेक्युरिटी गार्डची व्यवस्था करावी. मोकाट जनावरांचा वाढता उपद्रव कमी करण्यासाठी उपाययोजना करावी. उंदीर व डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी औषध फवारणी करण्यात यावी. विनाकारण बाजार बंद राहू नये याचे नियोजन करण्यात यावे. नाल्यांची नियमित सफाई केली जावी तसेच बाजार परिसरातील सर्व रस्ते अद्यावत सिमेंट कॉंक्रिटचे करण्यात यावेत.

# पुतनीला भेटायला गेलेल्या बहिन भावाचे रॉड घालून डोके फोडले!

**ांदेड/नरेन भारती**

विद्या बाळकृष्ण बन व रामकिशन बन हे आपल्या पुतानीला भेटण्यासाठी भावसार चौक नांदेड येथे धोंडू गिरी यांच्याकडे गेले होते. तेव्हा यातील आरोपींनी संगणमत करून आरोपी क्रमांक. एक व दोन यांनी फिर्यादीचे मोबाईल यावर फिर्यादीची पुतणी नामे कविता गिरी हिचे सासरे आरोपी धोंडू गिरी यांनी फिर्यादी आरोपी क्रमांक एक यांचे मोबाईल यावरून फिर्यादीच्या मोबाईलवरून फोन केला व म्हणाले की पुतणी कविता गिरी हिचा नंबर तुमच्या मोबाईलवर कसा फॉरवर्ड झाला व तुमच्याच फोनवर सारखा फोन का लागत आहे. असे म्हणत त्यांनी विद्या बन यांना शिवीगाळ केली त्यानंतर आरोपी क्रमांक एक व दोन यांनी मिळून फिर्यादीस व फिर्यादीच्या भावास शिवीगाळ करून विद्या बाळकृष्ण बन यांचे डोक्याचे वरील डाव्या बाजूस लोखंडी पाइपाने मारून जखमी केले. व तेव्हाच आरोपी क्रमांक दोन याने फिर्यादीच्या भावाचे डोक्याचे डाव्या बाजूस लोखंडी पाइपाने मारून दुखापत केली. विद्या बाळकृष्ण या दुकान चालक असून सत्य गणपती मंदिराजवळ पूजा साहित्य ते विकतात. त्याने पुतणीला भेटण्यासाठी भावसार चौक नांदेड येथे आले असता आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत डोक्यात रॉड घातला. रॉड घातल्यामुळे जखमी झाल्या त्यांचा भाऊ रामकिशन बजरंग गिरी वय ३६ वर्ष. सत्य गणपती मंदिराजवळ दाभाड येथे राहतात .त्यांची पुतणे यांना भेटण्यासाठी हे दोघी बहिण भाऊ तिथे गेले होते तिथे गेल्यानंतर कविता गिरी हिचा नंबर तुमच्या मोबाईल कसा फॉरवर्ड झाला तुमच्याच फोनवर सारखा फोन का लागतो आहे. असे म्हणत ते मला शिव्या देऊन भांडण करत होते तेव्हा मी म्हणाले की फोनवर शिव्या देऊ नका आम्ही तुमच्या घरी येतो समोरासमोर बसून गैरसमज काढू या त्यानंतर माझा भाऊ रामकिशन बजरंग गिरी व छत्तीस साते गणपती मंदिर राहतो दोघे मिळून माझी पुतनी कविता गिरी हिचे घरी अभंग अपार्टमेंट भावसार चौक नांदेड येथे आलो.

दिनांक २९/९/२३ रोजी वेळ दुपारी ०३ वाजता चे सुमारास पुतणी कविता गिरी याची घरी अभंग अपार्टमेंट भाऊसाहेब नांदेड येथे गेलो असता दरवाजा बाजीराव दरवाजा धोंडूगिरी यांनी दरवाजा उघडला व आम्ही घरात जाऊन बसलो त्यानंतर पुतनी कविता ही समोर बसली होती तेव्हा कविता म्हणाली की माझा फोन तुमच्या फोनवर सारखा का लागतो तेव्हा मी म्हणाले की मला मोबाईल मधील काही कळत नाही. मी काही केले नाही. तुमच्या तुमच्या मोबाईल मध्ये सेटिंग काही चुकले असेल असे मी कवितास म्हणाले असता तिचे सासरे धोंडू गिरी यांनी वाद घालून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली तेव्हा जवळ बसलेले माझ्या पत्नीचा पती गणेश धोंडगिरी व २५ वर्ष यांनी सुद्धा शिवीगाळ केली त्यानंतर वाद वाढत असताना धोंडोगिरी यांचा जावई नितेश भारती व धोंडू गिरी यांची पत्नी रेणुका धोंडगिरी हे दोघे मिळून आमच्यातील वाद सोडत असताना. गणेश गिरी याने बाजूच्या रूममध्ये जाऊन तेथे पडलेले लोखंडी पाईपाने विद्या बाळकृष्ण बन यांच्या डोक्यात वरील डाव्या बाजूस मारून जखमी केले व तेव्हाच गणेश गिरी याने रामकिशन बजरंग गिरी यांचे डोक्याचे डाव्या बाजूस लोखंडी पायपाने मारून दुखापत केली तेव्हा आम्ही पोलीस स्टेशनला येऊन झालेली घटना सांगितली पोलीस आणि मला व माझ्या भाऊला रामकिशन बजरंगिरी यास मार लागल्याने बघून उपचार करणे कामी वैद्यकीय पत्र देऊन सरकारी दवाखाना विष्णूपुरी नांदेड येथे पाठवले. सद्यास्थितीत आरोपी फरार असून भाग्यनगर पोलिस स्टेशन नांदेड यांच्या कडून संपर्क होत नाही. तेथील लैंड लाइन फोन घेतला जात नाही. आरोपीवर ३२४,१०७,५०४, ३४ नुसार गुन्हा नोंद केला आहे. आरोपीना पकड्यात पोलिसाना अद्यापही यश आले नाही. सदरील प्रकरणात आरोपी चार असताना दोघांचीच नोद घेतल्याचे म्हणने आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### वसईतील सुप्रसिद्ध जेष्ठ फौजदारी विधिज्ञ दिगंबर देसाई यांना मातृशोक



वसई : वसईतील सुप्रसिद्ध जेष्ठ फौजदारी विधिज्ञ दिगंबर देसाई यांच्या मातोश्री श्रीमती शकुंतला एस देसाई (वय ८७ वर्षे) यांचे बुधवार दि.२० सप्टेंबर रोजी रात्री १० वाजता मुंबईत चेंबूर येथील निवासस्थानी वार्धक्याने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी सकाळी १०.३० च्या सुमारास मुंबईतील चेंबूर छेडानगर येथून निघाली आणि घाटकोपर हिंदू स्मशानभूमीत त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे जेष्ठ पुत्र दिगंबर, रमण, अवधूत, निलेश आणि त्यांच्या सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. दरम्यान गुरुवारी श्रीमती देसाई यांच्या निधनाचे वृत्त समजताच वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर, आम. क्षितिज ठाकूर, माजी महापौर राजीव पाटील, माजी आमदार विवेक पंडित, बविआ नेते अजीव पाटील, तसेच वसईतील तज्ञ व जेष्ठ मान्यवर वकील संघ, सोबत तालुक्यातील विविध अशा सामाजिक राजकीय आदी क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार मंडळींनी दूरध्वनी व संदेशा द्वारे शोक व्यक्त केला आहे.

### ३ ऑक्टोंबर रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

पालघर : जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याच्या पहिल्या सोमवारी करण्यात येते. त्या अनुषंगाने या महिन्यातील ऑक्टोंबर २०२३ चा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि.०२ ऑक्टोंबर २०२३ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त सुट्टी असल्याने ऑक्टोंबर २०२३ महिन्याचा जिल्हा लोकशाही दिन मंगळवार दि. ०३ ऑक्टोंबर २०२३ रोजी दुपारी १:०० वाजता जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येणार आहे. तरी अर्ज केलेल्या नागरिकांनी सदर बैठकीस आवश्यक त्या माहितीसह प्रत्यक्ष वरील दिनांकास व वेळेवर उपस्थित रहावे.

### जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाच्या प्रस्तावित मतदान केंद्रांची यादी उपलब्ध

पालघर : १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्र सुसूत्रीकरण कार्यक्रमानुसार पालघर जिल्ह्यातील सर्व ०६ विधानसभा मतदारसंघाच्या प्रस्तावित मतदान केंद्रांची यादी (Annexure 1) हि जिल्हा निवडणूक शाखा पालघर, मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तसेच सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालयात प्रसिध्द करण्यात आली आहे व नागरिकांच्या व राजकीय पक्षांच्या अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यावर आपल्या सूचना असल्यास ०३ ऑक्टोबर, २०२३ पूर्वी या कार्यालयास सादर करावी. सदर यादी हि जिल्हाधिकारी पालघर यांचे संकेतस्थळ https://palghar.gov.in/en/notice-category/notice/ यावर देखील प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

### जिल्हास्तरीय गुरुवर्य पुरस्कार २०२३साठी प्रा. डॉ. बालाजी कारामुंगीकर यांची निवड



अहमदपूर : जी.एस.पी.एम. अर्थात गुणाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा जिल्हास्तरीय गुरुवर्य पुरस्कार २०२३ साठी प्रा. डॉ.बालाजी गोविंदराव कारामुंगीकर यांची निवड करण्यात आली आहे. सदरील जिल्हास्तरीय गुरुवर्य पुरस्कार सोहळ्याचे आयोजन दिनांक २ ऑक्टोंबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता जी.एस.पी.एम. कॅम्पस, जळकोट रोड, उदगीर जि. लातूर या ठिकाणी करण्यात आले असुन या आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सहपरिवार प्रा. डॉ. बालाजी कारामुंगीकर यांना जिल्हास्तरीय गुरुवर्य पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. बालाजी कारामुंगीकर यांचे शैक्षणिक, सामाजिक, पत्रकारिता, साहित्य क्षेत्रात दिलेले मोलाचे योगदानामुळे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सदरील पुरस्कारासाठी निवड झाल्यामुळे टागोर शिक्षण समितीचे सचिव, दलित मित्र, शिक्षण महर्षी डी. बी. लोहारे गुरुजी, अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगवीकर, प्राचार्य गजानन शिंदे, उपप्राचार्य प्रा. सय्यद एम.यू.यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### परिरक्षण भूमापकाला लाच स्वीकारताना अटक

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील परिरक्षण भूमापकाला अडीच हजारांची लाच स्वीकारताना सोलापूर लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने जेरबंद केले. खंडू मारुती रेगडे वय ४७ असे ताब्यात घेतलेल्या परिरक्षण भूमापकाचे नाव आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या आईच्या नावे मोरवड येथील गट नंबर ९१चा ९१/१ मधील एक हेक्टर ३१ आर जमिनीची मोजणी करून त्याबाबतच्या हद्दी कायम करून नकाशा मिळण्याबाबत तातडीचा अर्ज दिला होता त्यासाठी ३ हजार रुपये शासकीय चलन भरले होते. तरी देखील भूमापक रेगडे याने तक्रारदाराकडे मोजणी करून हद्द कायमचा नकाशा प्रिंट काढण्यासाठी व इतर कागदपत्रे तयार करण्यास लागणाऱ्या भारतासाठी ३ हजार रुपयांची लाचेची मागणी केली. त्यामुळे तक्रार देणाऱ्याने लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार नोंदवली त्यानुसार त्या तक्रारीची सोमवारी पंचा समक्ष पडताळणी केली असता आरोपीने ३ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून अडीच हजार रुपये लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. याप्रकरणी करमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपधीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी, पोलीस अंमलदार प्रमोद पकाले, गजानन केणगी, श्याम सुरवसे यांनी केली आहे.

क्राईम Reporter

क्राईम संध्या साप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉलवर उपलब्ध होईल.

9 8 9 0 7 1 8 8 7 3

02 TO 08 OCTOBER 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 9/30/2023 8:30 PM Page 1



# मराठ्यांनो आता तरी जागे व्हा!

**मराठी द्वेष्टांच्या मुजोरीला**
**सुप्रीम कोर्टाचा बसलाय दट्या!**
**गुजराती मारवाडी व्यापाऱ्यानो**
**आता तरी लावा मराठी पाट्या!!**

ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी अशी एक म्हण आहे. पण मुंबईत राहणारे परप्रांतीय मात्र या म्हणीच्या अगदी विरुद्ध वागत आहेत. त्यांच्या लेखी ज्याची खावी पोळी त्यालाच घालावी गोळी! संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मराठी माणसाने छातीवर गोळ्या झेलून मुंबईसह महाराष्ट्र मिळवला. त्यासाठी १०५ जणांनी प्राणाची आहुती दिली आहे. त्यामुळे मुंबई मराठी माणसांचीच आहे. कारण मराठी माणसाने ती लढून मिळवलेली आहे, अशावेळी मुंबईत राहणाऱ्या प्रत्येक परप्रांतीयाने मराठी माणसाचा, मराठी भाषेचा, मराठी संस्कृतीचा आदर राखायलाच हवा. जे कोणी मराठी भाषेचा आदर करणार नाहीत, त्यांना या मुंबईत आणि संपूर्ण महाराष्ट्रात राहण्याचा अधिकार नाही. या मुंबईने कधीही कुणाला परके मानले नाही. त्यामुळेच देशाच्या कानाकोपऱ्यातून इथे पोट भरण्यास आलेल्या प्रत्येकाला मुंबईने पोट भरण्याची मोठ होण्याची संधी दिली. इथल्या सर्व साधन सुचीतांचा वापर करून ते मोठे झाले. मराठी माणसानेही त्यांना मोठे होण्याची संधी दिली. आज मुंबईतले अंबानी सारखे उद्योगपती असोत की चित्रपट सुट्टीतले महानायक अमिताभ बच्चन असो या सर्वांना मुंबईने मोठे केले. केवळ उद्योगपती, कलावंत किंवा राजकीय क्षेत्रातील नेतेच नव्हेत, तर इथे छोटे-मोठे उद्योग करणारे परप्रांतीय मग ते हॉटेल उद्योगातील दक्षिण भारतीय असोत किंवा अन्य उद्योगातील गुजराती मारवाडी असोत या सर्वांना मुंबईने मोठे केले. मग ज्या मुंबईमध्ये नावलौकिक आणि पैसा कमावला त्या मुंबईच्या नावाची या लोकांना एलर्जी का? देशातील कोणत्याही राज्यात जा तिथल्या दुकानांच्या नावाच्या पाट्या या स्थानिक भाषेतच असतात. मग मराठी भाषेबद्दलच इथल्या गुजराती मारवाडी व्यापाऱ्यांना पोटदुखी का? मराठी पाट्यांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केलेले आंदोलन योग्यच होते. परंतु मराठी भाषेची एलर्जी असलेले काही गुजराती व्यापारी दुकानावर मराठी पाट्या लावायला तयार नव्हते. या लोकांना पूर्वीपासून मराठीचा द्वेष आहे आणि वेळोवेळी तो त्यांनी दाखवून दिलेला आहे. हाच द्वेष जर त्यांनी दक्षिण भारतातील कुठल्याही राज्यांमध्ये दाखवला असता, तर या लोकांना तिथल्या स्थानिकांनी लाथा घालून आपल्या राज्यातून हाकलून दिले असते. पण मराठी माणूस सोशिक आहे, सहनशील आहे, दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती मराठी माणसात आहे. त्याचा या लोकांनी गैरफायदा घेतलाय. त्यांना एक कळायला हवं होतं की, मुंबईत असलेल्या आपल्या दुकानांमध्ये खरेदी करण्यासाठी गुजरात वरून लोक येत नाहीत. तर मुंबईतीलच मराठी किंवा अन्य भाषिक लोक येऊन खरेदी करतात आणि त्यांच्यावर आपला व्यवसाय चालतो. उद्या जर इथल्या सर्व मराठी भाषिक लोकांनी ठरवलं की गुजराती मारवाड्यांच्या दुकानात खरेदीसाठी जायचं नाही. तर यांची दुकान चालतील का? पण दुर्दैवाने मराठी माणूस वेगवेगळ्या राजकीय पक्षांमध्ये विखुरला गेलाय. त्यामुळे या लोकांचे फावलेय. वास्तविक २०१६ मध्ये मुंबई महानगरपालिकेने एक प्रस्ताव मंजूर केला होता की जात धर्म भाषा आणि खानपान यांच्या आधारे कोणाशीही भेदभाव करता येणार नाही. दुर्दैवाने राज्य सरकारने या प्रस्तावाला मंजुरी दिली नाही. याचे कारण काँग्रेस आणि भाजपासारख्या राष्ट्रीय पक्षांनी मुंबईतील परप्रांतीय लोकांच्या मुजोरीला अप्रत्यक्षपणे पाठिंबा दिलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात काँग्रेस सरकार असो की भाजपचे सरकार असो परप्रांतीयांच्या मुजोरी विरुद्ध मराठी माणसांना बोलायला मुभा नाही. जो कोणी त्यांच्याविरुद्ध बोलेल तो कायद्याचा गुन्हेगार ठरतो. म्हणून तर या लोकांची मुजोरी वाढलेली आहे. दुकानांवर मराठी पाट्या लावण्यास विरोध करणारे इथले मराठी द्वेष्टे सुप्रीम कोर्टात गेले होते. पण सुप्रीम कोर्टानेही त्यांच्या कानाखाली आवाज काढलाय. त्यामुळे आता महाराष्ट्र सरकारने दुकानांवरील मराठी पाट्या बाबत आग्रही भूमिका घ्यावी. पण दुर्दैवाने आज महाराष्ट्राच्या सत्तेत जे कोणी बसलेले आहेत. त्यांच्यावर दिल्लीतील गुजराती लॉबीचा दबाव आहे. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने जरी मराठी पाट्यांबाबत सकारात्मक आदेश दिलेला असला, तरी महाराष्ट्रातल्या सरकारला त्याची अंमलबजावणी करायची हिम्मत होणार नाही. मग अशावेळी मराठी माणसाने हाताची घडी तोंडावर बोट अशाच स्थितीत राहायचे का? आज मुंबईची या लोकांनी धर्मशाळा करून टाकली आहे. आणि या धर्मशाळेत मराठी माणसावर पेयीग गेस्ट होण्याची पाळी आली आहे. भारतीय संविधानातील तरतुदीनुसार देशातील नागरिक कोणत्याही राज्यात जाऊन राहू शकतो तिथे काम धंदा करून स्थानिक होऊ शकतो. पण ज्यावेळी तो एखाद्या राज्यात पोट भरण्यासाठी जातो, त्यावेळी त्याने त्या राज्याची संस्कृती, त्या राज्याची भाषा, याबद्दल आदर राखणे ही त्याची नैतिक जबाबदारी आहे. पण आज परिस्थिती अशी आहे की मुंबईत एखाद्या ठिकाणी जर इमारत बांधली जात असेल आणि त्या इमारतीत जर मारवाडी गुजराती यांची संख्या जास्त असेल, त्यांची सोसायटी असेल तर त्या ठिकाणी मराठी माणसाला जागा मिळू शकत नाही. काय तर म्हणे मराठी माणूस मांसाहारी आहे. अरे पण या देशात लोकशाही आहे. कोणी काय खायचं कसले कपडे घालायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. तुम्ही कोण सांगणारे? मराठी माणूस जर मटण मच्छी खात असेल तर त्याची मर्जी! त्याने काय खायचं, काय परिधान करायचं हे त्याचं तो ठरवील. तुम्ही शाकाहारी आहात म्हणून इतरांनी शाकाहारी असायला पाहिजे हा कुठला न्याय? या देशात लोकशाही आहे. आणि लोकशाही प्रत्येकाला त्याच्या मर्जीनुसार वागण्याचा पूर्ण अधिकार आहे. केवळ एखाद्या समाजाचा माणूस मांसाहारी आहे म्हणून त्याला सोसायटीमध्ये जागा नाकारणे हा कायद्याने गुन्हा आहे. त्याचबरोबर मुंबई महानगरपालिकेच्या २०१६ सालि पारित झालेल्या त्या प्रस्तावाच्या विरुद्ध हा प्रकार आहे. अशावेळी राज्य सरकारने स्वतःहून पुढाकार घेऊन कारवाई करायला हवी. पण गुजराती मारवाडी पुढाऱ्यांचे बटीक बनलेले इथले राज्यकर्ते मराठी माणसाला, मराठी भाषेला, कदापि न्याय देऊ शकणार नाहीत. कारण त्यांना मराठी माणसाची काही पडलेली नाही. त्यांच्यासोबत जो मराठी माणूस आहे तो अंधभक्त आहे. त्याला फक्त आणि फक्त पंतप्रधान मोदींची महानता दिसते आहे. त्यांच्या महानतेसमोर महाराष्ट्र मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी स्वाभिमान हे सार काही तुच्छ आहे. त्यांना आपल्या राज्यापेक्षा, आपल्या माय मराठी भाषा आणि संस्कृती पेक्षा पक्ष महत्त्वाचे वाटतात. म्हणूनच अशांना मराठी माणसाने आगामी निवडणुकीत जोड्याजवळ ही उभे करू नये. काँग्रेस, भारतीय जनता पार्टी, शिंदेंची शिवसेना, ठाकरेंची शिवसेना या सर्वांपेक्षा महाराष्ट्र आणि मराठी माणूस व त्याने लढून मिळवलेल्या मुंबईचे महत्व मोठे आहे. म्हणूनच आता खूप झाले! ज्यांना परप्रांतीयांच्या ताटा खालचे मांजर व्हायचे आहे त्यांना खुशाल होऊ द्या! पण जो सच्चा मराठी माणूस आहे. ज्याचं मुंबईवर, महाराष्ट्रावर आणि मराठी भाषेवर प्रेम आहे, ज्याच्यामध्ये शिवप्रभूंचा मराठी बाणा आहे, त्याने मात्र भाजपा, काँग्रेस-राष्ट्रवादी किंवा शिवसेनेतील भाजप सोबत असलेल्या मराठी पुढाऱ्यांच्या नादाला लागू नये. या निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी यातच महाराष्ट्राचे आणि आमच्या मुंबईचे भले आहे.

## स्वच्छतेसाठी करूया एक तास श्रमदान!

**गांवाचे जरी उत्तम नसलें। तरि देशाचे भविष्य ढासळले**
**ऐसे मानावे जान त्याने भले। हृदया माजी ।।**

संत तुकडोजी महाराजांनी रचिलेल्या ग्रामगीतेतील पहिल्याच अध्यायातीलही ५०वी ओवी. गाव चांगले असेल तरच देशाचे भविष्यही चांगले होते, असा त्यांचा संदेश. गावच्या विकासासाठी संतानी आपापल्या परिने प्रयत्न केले. त्यातीलच संत गाडगेबाबा व तुकडोजी महाराजांचे योगदान महत्वाचे मानले जाते. देव-देवतांच्या पूजेबरोबरच श्रमातून भक्ती करा. गाव चांगले स्वच्छ ठेवा. त्यामुळे देशाचे भवितव्य उज्वल होईल, ही शिकवण त्यांनी युवकांना देण्याचा प्रयत्न केला. सद्यस्थितीत ग्रामीण व शहरी भागात स्वच्छतेला महत्व दिले जात असून याकरिता स्वच्छ भारत अभियान राबविले जात आहे. येत्या १ ऑक्टोबर रोजी देशात सर्वत्र स्वच्छता ही सेवा पंधरवडा अंतर्गत स्वच्छतेसाठी एक तारीख-एक तास अभियान राबविले जाणार आहे. यामध्ये सर्वजण सक्रीय सहभागी देवून आपला परिसर, गाव, शहर स्वच्छ करूया! घरांची, गावांची, परिसराची स्वच्छता करून सर्वसामान्य जनतेचे आरोग्यमान उंचवावे, यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. स्वच्छतेतून समृध्दीकडे' ही संकल्पना यामुळे मूर्तरुपात येण्यास मदत होईल. आपण विदेशातील शहरांची स्वच्छता पाहून त्यांचे गुणगान गातो, मात्र तेथील स्वच्छता, शिस्त, सौंदर्य, सृष्टी व हिरवळ वाखाणण्याजोगी आहे, ती केवळ तेथे राहणाऱ्या लोकांमुळेच. त्यांच्या स्वच्छतेच्या सवयीमुळेच आहे, हे मात्र आपण विसरतो.

आपण आपल्या मनाला, शरीराला, घराला, परिसराला स्वच्छ बनविण्यासाठी पाऊल उचलण्याची नितांत आवश्यकता आहे. आपण आपले घर स्वच्छ ठेवतो. पण आपला परिसर स्वच्छ ठेवत नाही. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांमुळे आपले आरोग्य धोक्यात येऊन आपला घामाचा पैसा व वेळ वाया जात आहे. आज सार्वजनिक ठिकाणी बसमध्ये, लोकल, ऑफिस, उदयान, इमारती, रस्त्यांवर, गल्ली बोळांत, आपल्याला अस्वच्छता दिसते. कुठेही थुंकणे, पान खाऊन पिचकारणे, सिगारेटची थोटके, खाद्य पदार्थांची वेष्टने, कागदाचे तुकडे, तंबाखू, गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी रंगविलेल्या भिंती दिसतील. कचऱ्याचे डोंगरच्या डोंगर शहरांमध्ये तयार होत आहेत. कितीजण आपल्या मुलांना स्वच्छतेचे महत्व सांगातात? त्याचे अनुकरण करायला सांगतात? आणि स्वत: ही त्याचे अनुकरण करतात? आपल्याकडे अनेक रोग हे अस्वच्छतेमुळे होतात. त्यामुळे घराची व परिसराची स्वच्छता हे उत्तम आरोग्यासाठी आवश्यक आहे.

**आपले मन स्वच्छ, तर आपले घर स्वच्छ।**
**आपले घर स्वच्छ, तर आपला परिसर स्वच्छ ।।**

या उक्तीप्रमाणे स्वच्छता राखण्यासाठी स्वत: पासून सुरुवात करावी लागेल. त्याच प्रमाणे मी स्वत: ही परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी आठवड्यातून किमान एक तास स्वच्छता करण्याचा संकल्प करुन तसा प्रयत्नही सुरु केलेला आहे. त्याचप्रमाणे मी स्वत: ही घाण करणार नाही व दुसऱ्यालाही घाण करु न देण्याचा प्रयत्न करीन. सर्व प्रथम मी स्वत: पासून, माझ्या कुटूंबा पासून, माझ्या गल्ली किंवा वस्तीपासून, माझ्या गावा पासून ते कार्यस्थळापर्यंत या कामास सुरुवात करीन, असा निश्चय प्रत्यकाने करावा लागणार आहे. आपण केवळ वैयक्तिक स्वच्छतेवर भर न देता सामुदायिक पातळीवर एकत्र येवून काम करण्याची गरज आहे. यामुळे आपण केवळ वैयक्तिक स्वार्थ साधत नाहीतर, ती एक मोठी देश सेवा व निसर्ग सेवाही आहे. त्यामुळे आपण सर्वजण स्वच्छता ही सेवा पंधरवडा अंतर्गत स्वच्छतेसाठी 'एक तारीख-एक तास' उपक्रमात सक्रियपणे सहभागी होवून आपला परिसर, आपला गाव, शहर स्वच्छ करण्यास हातभार लावूया...!!

**- उद्धव फड, संवाद तज्ज्ञ**

## शेतकऱ्याच्या स्वातंत्र्यासाठीच, राज्यात व केंद्रात 'स्वतंत्र शेतकरी मंत्रालय'

शेतकऱ्यांच्या हिताचे दृष्टीने काही मुद्दे दृष्टीक्षेपात आले. १) राजकीय पक्ष व सत्ताधीश हे शेतकऱ्यांना उत्पादनवाढविण्याचे सल्ले देतात, उत्पादन वाढविणे ही देशाची गरज असली तरी, शेतीमालाला भाव कमी देऊन, शेतकऱ्यांचा सत्यानाश केलाजातो. शेतकऱ्यांची गरज तेव्हाच कळेल जेव्हा शेतकरी कमी उत्पादन काढतील आणि फक्त स्वतःपुरते पिकवतील. टमाट्याची टंचाई होती म्हणून टमाट्याचे भाव वाढलेत. कांद्याची टंचाई निर्माण होते तेव्हा आहा:कार होतो, सरकार पडते. आयात- धोरणाने शेतीमाल जरी देशात आला तर तो आमदार, खासदार, मंत्री यांचे त्यात हात ओले होतात. म्हणून शेतीमालाची टंचाई नुसती किमान दोन वर्ष निर्माण करणे, गरज तयार झाली आहे. नाहीतर फक्त दूध, मिरची, कांदा, उत्पादने तरी बंद केले तरी सरकार हादरते. मस्त दोन वर्ष शेतीचे वहिवाटी करून शेतीचे पोत दुरुस्त करणे व जमीन कसदार बनविणे, काही भाग पिकवून व बाकी शेतीची मशागत करणे. मात्र जमीन पडीत ठेवू नये. व फक्त स्वतःच्या जगण्यापुरते ,स्वतःपुरते पिकविणे शेतमालाची विक्रीच करू नये. शेतकऱ्याला सतत अडचणीत ठेवून शेतमाल बाजारात येण्या साठी ही सोयीची उपलब्धता केल्या जात आहे. उत्पादन वाढविण्याच्या नादात दुकानदार, कारखानदार व इतर यंत्रणा पोसणे कमी करावे, व शेतीवरील खर्च कमी करणे. मागील काळात आपण देशी बियाणे पेरू खर्च कमी करत होतो. घरातीलच जमा करून ठेवलेले बी बियाणे काढून शेती करत होते तेच आताही किमान दोन वर्ष करावे लागेल. सरकार आपोआप शेतकऱ्यांच्या बाजूने बोलायला लागेल व पक्ष प्रतिनिधी हे रस्त्या- रस्त्यावर मार खातील तेव्हाच शेतकऱ्यांची खरी किंमत राज्याला व देशाला कळेल. शेतकऱ्याच्या हिताचे कायदे दुरुस्त होतील. उत्पादन वाढीचा फायदा शेतकऱ्याला होत नसून शहरीकरणाच्या, राज कारणाला व शहरातील लोक पोसण्यासाठी होतो. पण अशा संकुचित धोरणाने शेतकरी मात्र मरतो. त्यासाठी शेतीमालाची टंचाई निर्माण करणे. शेतकरी संघटनेने हे सर्व उपाय केले आता पुढील एकाच इलाज आहे बाकी कोणतेही उपाय करून सरकार हादरत नाही, वठणीवर येत नाही. रास्ता रोको झाले जेल भरून झाले रेल्वे रोको झाले भरपूर आंदोलने झाली, यामधून फक्त केसेस शेतकरी कार्यकर्त्यांनी अंगावर लावून घेतले यापेक्षा काहीही फरक पडला नाही. २) शेतकरी जेव्हा शासनाच्या धोरणाच्या विरोधी वागेल तेव्हाच खरी शेतकऱ्यांमध्ये जागृतता येईल. त्यासाठी ही मोहीम सर्व राज्यातील व देशातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन करावी लागेल, पुन्हा शेतकऱ्यांचा संप करावा लागेल, उत्पादन बंद आंदोलन करावे लागेल. शहरात शेतीमाल आला नाही तर शहरे ओसाड पडतील , त्याचा परिणाम शहरावर होईल तेव्हाच सरकार हादरेल.आता रस्त्यावरची लढाई नको, आंदोलन नको, शांततेच्या मार्गाने चालणारे हे तीव्र आंदोलन आहे. तर ती शेतीत कृतीत करावी लागेल. आम्हाला तुम्ही मारून टाकले आता आम्ही तुम्हालाच मारून टाकणार. लॉकडाऊन च्या काळात औद्योगिक उत्पादने बंद होती, तरी देशात कोणती वस्तू मिळाली नाही, कोणताही तुटवडा नव्हता. पण शेतमाल तयार झाला नाही तुटवडा पडला तर .....तेव्हा आता पुढील पिढीला हाच निर्णय घ्यावा लागेल. आता सरकारला , सर्व शेतकरी विरोधी वागणाऱ्या व्यवस्थेला चपराक बसण्यासाठी व शेतकऱ्यांना स्वतःचे हित जोपासण्यासाठी आता फक्त हेच करावे लागणार, या पक्ष प्रतिनिधीचे हार तुरे नाही तर जाब विचारणे सुरू करा, तेव्हाच ही व्यवस्था दुरुस्त होईल. ३) शेतकरी हिताचे कायदे तयार करणे गरजेचे आहे,सन १८ जून १९५१ ला केलेली घटना दुरुस्ती मुळे शेतकरी संपविण्यात आला व औद्योगीकरण वाढले, त्यासाठी पुन्हा आमदार, खासदार ची संख्या विधानसभेत, संसदेत शेतकरी विरोधी कायदे बदलण्यासाठी लागेल. आणि असे निर्णय राज्य व केंद्र सरकार करण्याच्याच्या मानसिकतेत नाही, आणि असे कायदे केले एखाद्या पक्षाने केले तरी, इतर राजकीय पक्ष विरोधी आवाज उठवून दुकानदारी साधल्या शिवाय राहत नाही . हे आपण मागील काळात दीड वर्ष दिल्ली येथे चाललेल्या आंदोलनातून पाहिले. काही राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या बाजूने होते तर काही राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या विरोधात होते. स्वतःच्या दुकानदारासाठी शेतकऱ्याच्या नावाने राजकीय पार्ट्या काढल्या. त्याचे कारण हे आताचे कायदे सत्ताधीशांच्या व राजकीय पक्षांच्या फायद्याचे आहेत, म्हणून छोट्या मोठ्या पार्ट्या आता फोफावत आहे व यांच्या दुकानदाऱ्या वाढणार आहे. कोणताही राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या फायद्याचे नाहीत. तर ते जुनेच कायदे अमलात आणणार आहेत आणि अशा व्यवस्थेत शेतकरी पुन्हा मरणार आहे. ४) सर्वच राजकीय पक्षांचा जोर राजकारणाच्या हितासाठी शासनाची तिजोरी शहरी विकासात गुंतून पडत आहे. राज्यात व केंद्रात नट नट्या व ज्यांना भुईमुगाच्या शेंगा कुठे लागतात हे कळत नाही असे आमदार, खासदार, अशिक्षित आणि जातीच्या भरोशावर निवडून आणून, राज्य करणे आणि शेतकरी धोरण हाणून पाडणे हा मोठा उद्देश आहे. आता शहरीकरणं वाढविण्याची आवश्यकता संपली. शहरीकरण पोसण्यासाठी सरकारी तिजोरीवर भर पढत आहे .एकट्या मुंबई आणि ठाणे शहरात ६० आमदार आहेत व संपूर्ण विदर्भातील ११ जिल्ह्यात ६२ आमदार आहेत. शेतकऱ्यांना सतत गुलामगिरीत ठेवून राज्य करण्याचे हेतूने सत्ताधीशांनी, व राजकीय पक्षांनी आतापर्यंत सत्ता चालविली. ही जबाबदारी आता पुन्हा शेतकऱ्यावर दुरुस्त करण्याची आली आहे. नुसता शेतकऱ्यांना लॉलीपॉप देऊन, पिक विमा व इतर आमिषे , कोरडे आश्वासने देवून, अनुदान देण्याचे घोषणा करून फक्त टाईमपास करणे चालू आहे. ५) शेतीचे उत्पादन वाढविताना शेतकऱ्यांच्या वैयक्तिक समस्या तयार झाल्यात, काही प्रश्न निर्माण झालीत. शेतकऱ्यांनी स्वतः दुःखात राहून, इतरांना जगविले. मात्र स्वतःचा घात करून घेतला. आम्ही एका दाण्याचे १००० दाणे करण्याच्या नादात एका रुपयाचे एक हजार रुपये करणे विसरलो. आपण उत्पादन वाढून खूप पुण्य करतो आहे, या विचारात तो फसला. कारण त्याला सरकारच आपल्या विरोधी वागते हे कळत नव्हते. त्याचे प्रश्न, समस्या गेल्या ७५ वर्षात कोणत्याही राजकीय पक्षाच्या सरकारने सोडविल्या नाहीत. शेतीच्या व्यवस्थेसाठी अनेक मंत्रालय आहेत, परंतु शेतकऱ्यांना न्याय अधिकार व समस्या सोडविण्यासाठी का स्वतंत्र व्यवस्था तयार करण्यात आली नाही? भारत देश जर ७० टक्के कृषीप्रधान देश असेल, तर ती जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याला तुम्ही जगाचा पोशिंदा, बळीराजा, अन्नदाता, जीवन दाता म्हटले, अन भारत देशात त्याचीच अवहेलना करून त्याला मातीत घातले, याला च तुम्ही या देशाचे आर्थिक धोरण म्हणाल काय? ६) शेतीचे उत्पादन वाढविण्या साठी कृषी मंत्रालय केले, वंशपरंपरेने वाहणाऱ्या शेतकऱ्यां च्या कुळासंबंधी जमिनीचे रेकॉर्ड सांभाळण्यासाठी महसूल मंत्रालय झाले. जमिनीचे क्षेत्रफळ व मोजमाप करण्यासाठी अन् वाद-विवाद मिटवीण्यासाठी व वाढविण्यासाठी भुमी लेख कार्यालय झाले, पिकविमा चा कुटील तमाशा उभा केला , श्रम मंत्रालय झाले, अपंग मंत्रालय झाले, राज्याच्या व देशाच्या हितासाठी भूसंपादन कायदा आणला. राजकीय पक्ष चालवण्यासाठी , पक्षाच्या सोयीनुसार राज्यात व देशात अनेक कायदे मोडले, तोडले व पुन्हा जोडले, व पुन्हा पुन्हा दुरुस्त केले. मात्र डॉ. आंबेडकरांच्या मूळ संविधानाचे फार चिंधड्या केल्या? स्वर्गीय शरद जोशी मी आपल्याला मास्टर प्लॅन लागू होत नाही तर या देशात शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कोर्टात जावे लागते व तिथे सुद्धा निकाल दुरापास्त झाला आहे खरे आणि खोटे प्रश्न येतात तराजू तोलले जात आहे. शेतीमालाला भाव मागितला तो शेतकरी गुन्हेगार होतो. शेतीची मशागत करत असताना त्याला येणारे आर्थिक सामाजिक प्रश्न शेतीतील भाऊबंतीचे वाढ शेतीचे रस्ते इतर शेतकऱ्यांच्या जीवनात कौटुंबिक समस्या निर्माण झाली त्याच्या सुख सुविधासाठी त्याला कर्जातून मुक्त केल्या जात नाही. असे होते भेडसावणारे प्रश्न त्याच्यावर नजरेसमोर आलेत कोणाला न्याय मागावा एवढी ताकद सुद्धा त्याच्या विचारात राहिली नाही. म्हणून शेतकरी आत्महत्या सत्र असेच सुरू राहणार. एवढ्या गंभीर प्रश्नावर शासन लक्ष कधी घालणार. ७) तर मग शेती वाहणाऱ्या कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यां चे होणारे बेहाल सरकारला दिसले नाही काय? सरकारला हे सर्व माहीत असून जाणीवपूर्वक राज्य व केंद्र सरकारने शेतकऱ्याला वाळीत टाकले. शेती वाहणाऱ्या जिवंत प्राण्याच्या समस्या सोडविण्या साठी स्वतंत्र शेतकरी मंत्रालय का उभे झाले नाही. त्यासाठी मी अनेकदा वृत्तपत्र लेखन , गुगल वर लेखन,येऊन स्वतंत्र शेतकरी मंत्रालय का झाले नाही ? म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात व देशात चर्चा घडविण्याचा सतत प्रयत्न, व्हाट्सअप द्वारे, फेसबुक द्वारे वृत्तपत्राच्या माध्यमातून, अनेकदा चर्चा घडविली. वृत्तपत्रात ४० लेख लिहून शेतकऱ्यांना जागृत केले. ८) कवी, लेखक, ग्रामगीता प्रचारक, आमदार, खासदार, मंत्र्यांनी फक्त सतत शेतकऱ्यांच्या समोर येऊन शेतकऱ्यांच्या दुःखाचे पाढे वाचलेत, व त्यांनी शेतकऱ्यांना भावनाहीन बनवून स्वतःचा हेतू साध्य केला. पारितोषिक मिळवीले, शेतकऱ्यांच्या दुःखाचे गाऱ्हाणे मांडून नावलौकिक मिळविला. कोणी दुःखाच्या कविता, गाणी ऐकून टाळ्या वाजविल्या, कोणी शोक व्यक्त केला आणि त्यातून मनाला गंभीर वेदना सुद्धा झाल्या ? शेतीमालाला भाव मागणे हा गुन्हा आहे तसे कायदे करून ठेवले आहेत. म्हणूनच तर शेतकऱ्यावर गोळीबार व कोर्ट केसेस लाठी हल्ला होतो. स्टेजवर दुःखाचा पसारा मांडून ,स्वहित साधणाऱ्यांची संख्या मात्र सतत वाढत गेली. यांना स्टेजवर दुःखाचे गाणे गावून स्वतःचे हित जोपासता आले तर हरामखोरांनो सर्वांनी एकत्र येऊन हे कायदे कां नाही बदलवीले ? सर्वांनी मिळून शेतकऱ्याला दुःखाच्या बाहेर का काढले नाही? दरवर्षी पंढरीला लाखो भक्त येतात व विठू रायाला साकडे घालतात. यावर्षी पाऊस येऊ दे, व शेतकरी सुखी होऊ दे. आणि दरवर्षी मुख्यमंत्री सुद्धा येऊन तिथे तेच गाणे गातात., आणि हेच मुख्यमंत्री त्यासाठी स्वतःच्या आमदारांना व खासदारांना कायदे बदलण्याच्या सूचना मात्र देत नाहीत. अशी शोकांतिका किती दिवस जनतेने पहावी. ९) आयात- निर्यात धोरण ,खुली अर्थव्यवस्था, व तसेच शेतकरी सुखी होण्यासाठी, महात्मा फुलेंनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी, शेतकऱ्यांचे पंचप्राण शरद जोशी नी, सतत आवाज उठविला, लाठया काठया खाल्लूया, गोळीबार सोसले, शेतकऱ्यांनी जैल भोगले. मात्र आजच्या राज्यकर्त्यांनी शेतकरी स्वतंत्र होऊ दिला नाही. १०) शेतकऱ्यांच्या नुकसानीची व दुःख पचवण्याची दानत फक्त शेतकऱ्या मध्येच आहे. सरकार शेतकऱ्यांना पोसत नाही तर शेतकरी, शेतमजूर सरकारला पोसते. मात्र समाजात चित्र वृत्तपत्रातून, मीडियातून, इलेक्ट्रॉनिक मीडियातून, सरकार शेतकऱ्याला चालवते , हीच उलट परिस्थिती सांगून शेतकऱ्यांच्या माथि मारते. ११) शेतकरी नेते धनंजय पाटील काकडे यांनी ही सर्व व्यवस्था दुरुस्त करण्यासाठी राज्यात व केंद्रात स्वतंत्र शेतकरी मंत्रालयाची मागणी केलेली आहे. संपूर्ण राज्यात मागील फेब्रुवारी २०२३ महिन्यात शेतकरी, वारकरी- कष्टकरी महासंघाची जनजागर दिंडी ४५०० की.मी. प्रवास पूर्ण करून वाहन यात्रा काढण्यात आली होती. लोकांच्या भावना लक्षात घेता, राज्यातील जनतेने त्यांना प्रतिसाद दिला आहे. त्यासाठी महाराष्ट्रभर प्रचार यंत्रणा उभी करण्याची, तयारी केल्या जात आहे . राज्यात व केंद्रात शेतकरी, वारकरी- कष्टकरी महासंघाचे प्रतिनिधी निवडून आल्यास निश्चितच स्वतंत्र शेतकरी मंत्रालय मिळाल्याशिवाय राहणार नाही. त्याचा पहिला टप्पा म्हणून१५ ऑक्टो. पासून ७ नोव्हें २०२३ पर्यत विदर्भाचा दौरा होईल, त्यानंतर मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्र व नंतर उत्तर महाराष्ट्र दौरा होईल. शेतकरी विचाराच्या धोरणाचे, आर्थिक धोरणे समजणारी नेते विधान भवन संसद मध्ये पाठवावी लागेल. ती किमान शंभरच्या वर असली तरच हा प्रश्न निकाली लागेल.शेतकऱ्यांना न्याय, हक्क, अधिकार व समस्या सोडविण्यासाठी, स्वतंत्र शेतकरी मंत्रालय मिळणारच! शेतकऱ्यांना आपल्या हक्काचे, अधिकार त्यामध्ये मिळून घ्यावे लागेल. नुसते मंत्रालय वेगळे करून भागणार नाही, तर ती व्यवस्था बदलावी लागेल.

**धनंजय पाटील काकडे, शेतकरी, वारकरी-कष्टकरी महासंघ**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# देवणी येथे लॉज मालक अशोक लुल्ले यांचा खून



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील मध्यवर्ती ठिकाणी उदगीर-निलंगा राज्य महामार्गालगत असलेल्या शिवपार्वती लॉजमध्ये दि.२६ सप्टेंबर रोजी रात्री ८ ते २७ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास खुन झाल्याने शहरात खळबळ उडाली असून पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली होती. याबाबत देवणी पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, शहरातील सामाजिक कार्यकर्ते शिवपार्वती लाजचे मालक अशोक मन्मथअप्पा लुल्ले वय (६४) हे आपल्या स्वताच्या लाजवरील एका रुममध्ये झोपले असताना बुधवारी दुपारी रक्ताच्या थारोळ्यात आढळले. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने लॉजमध्ये प्रवेश करून त्यांच्या डोक्यात लोंखडी हत्याराने वार करून त्यांचा खुन झाला असून खुन कुणी केला याबाबत अद्यापही स्पष्ट माहिती उपलब्ध नाही व तसेच त्यांच्या हाताच्या बोटामधील १० ग्रामची अंगुठी, २ तोळे सोन्याचा लॉकेट व विवो कंपनीचा मोबाइल हँडसेट घेऊन गेल्याचे देवणी ठाणे अमलदार यांनी क्राईम संध्या शी बोलताना सांगितले मंगळवारी रात्री त्यांचा मोबाईल बंद होता घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी नितिन कटेकर यांनी भेट देत पाहणी करीत तपासकामी आवश्यक ती सुचना व घटनास्थळी आढळलेल्या संशयास्पद वस्तूंची पाहणी केली, लॉजच्या परिसरात बघ्याची गर्दी वाढल्याने केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या जवानांनी परिसर सिल केला होता, सदर गुन्ह्याचा तपास करण्यासाठी तीन पथके तयार केले असून त्यात देवणी पोलिसांचा एक पथक, उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा कार्यालयाचा एक पथक व लातूर गुन्हे शाखेचा एक पथक असे तीन पथक तयार केले गेले आहेत. घटनास्थळी श्वानपथक व ठसेतंज्ञाना पाचारण करण्यात आले होते. उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विष्णुकांत गुट्टे पुढील तपास करीत असून मयताचे भाऊ सोमनाथ लुल्ले यांच्या फिर्यादीवरून अज्ञात, अनोळखी आरोपी विरोधात कलम ३०२,२०१ भादवी प्रमाने गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# एनजीएफच्या ८व्या राष्ट्रीय दिव्यांग ध्येयपूर्ती पुरस्कार २०२३ सोहळ्याचे आयोजन

## डॉ. प्रकाश आमट, डॉ. मंदाकिनी आमटे, आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील, शौर्य चक्र विजेते कमांडो मधुसुधन सुर्वे विशेष पाहुणे

**मुंबई/प्रतिनिधी**

शारीरिक आणि मानसिक दिव्यांगांकरिता त्यांचे अधिकार आणि सन्मान मिळवून देण्यासाठी गेल्या एका तपाहून अधिक काळ सातत्याने कार्यरत असलेली 'नूतन गुळगुळे फाउंडेशन' (एनजीएफ) ही मुंबईतील प्रख्यात संस्था असून या संस्थेचा ८-वा राष्ट्रीय ध्येयपूर्ती पुरस्कार -२०२३ सोहळा शनिवार दिनांक ७ ऑक्टोबर २०२३ रोजी, संध्याकाळी ५:३० वा., पु.ल. देशपांडे सभागृह, टिळक मंदिर, विले पार्ले (पूर्व), मुंबई येथे संपन्न होणार आहे. या खास सोहळ्यासाठी जंगलात वास्तव्य करणाऱ्या माडिया गोंड' आदिवासी जमातीतील लोकांना भूक, रोगराई, अंधश्रद्धेच्या विळख्यातून सोडवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपलं संपूर्ण आयुष्य वेचणारे, बाबांचे स्वप्न हेमलकशात प्रत्यक्षात उतरवणारे मॅगसेसे' पारितोषिक विजेते डॉ. प्रकाश आमटे आणि त्यांच्या सौभाग्यवती डॉ. मंदाकिनी ताई आमटे, तसेच देशासाठी युद्धभूमीवर अलौकिक शौर्य गाजविणारे शौर्य चक्र विजेते कमांडो मधुसुधन सुर्वे आणि गुन्हेगारांचे कर्दनकाळ म्हणून परिचित असलेले युवा आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील, एस बी आय जनरल इन्शुरन्सचे डेप्युटी मॅनेजिंग डिरेक्टर आनंद पेजावर, पत्रकार, व्यवसाय प्रमुख आणि एडिटर झी २४ तास - मीश्री निलेश खरे या मान्यवरांच्या विशेष उपस्थितीत यंदाचा 'नूतन गुळगुळे फाउंडेशन'चा ८ वा राष्ट्रीय दिव्यांग ध्येयपूर्ती पुरस्कार-२०२३' सोहळा रंगणार असल्याचे एनजीएफच्या संस्थापिका - अध्यक्षा सौ नूतन विनायक गुळगुळे यांनी जाहीर केले आहे. या सोहळ्यासाठी विविध भाषा - परंपरा आणि संस्कृती असलेल्या आपल्या देशातील अनेक राज्यांतून दिव्यांग स्पर्धकांच्या भरघोस प्रवेशिका प्राप्त होतात, अलौकिक आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दिव्यांगांना पुरस्कार देऊन त्यांचे मनोबळ वाढविण्याचे काम करणारी ही देशातील पहिली संस्था आहे. 'नूतन गुळगुळे फाउंडेशन' करोना-१९'मुळे पालकत्व गमावलेल्या 'ग्रामीण भागातील दिव्यांग' बालकांकरिता विरार, अर्नाळा येथे वसतिगृह आणि प्रशिक्षण केंद्र सुरु लवकरच सुरु करणार आहे. असा प्रकल्प राबविणारी भारतातील ही एकमेव संस्था ठरणार आहे. सध्या या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले असून २०२४ च्या सुरुवातीला ४० मुले व ४० मुली आपल्या एकल पालकांसोबत येथे दाखल होणार आहेत. शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या दिव्यांग असलेल्या परंतु काहीतरी अद्वितीय कर्तृत्व सिद्ध करून आपल्या कौशल्यांचा उत्तम वापर करून आपल्या व्यवसायात/जीवनात एखादी सर्वसाधारण व्यक्ती विचार करू शकणार नाही, असे काहीतरी अलौकिक कार्य सिद्ध केलेले व्यक्तींचा गुणगौरव करणारा हा सोहळा आहे. वैयक्तिक श्रेणीतील नऊ पुरस्कारां सोबतच 'माय लेक पुरस्कार', 'कौटुंबिक पुरस्कार'(एकाच कुटुंबातील दोन /तीन सभासद दिव्यांग), तसेच 'संस्था पुरस्कार' (सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था), 'जीवन गौरव पुरस्कार' (६५ वर्षे व अधिक), आणि मरणोत्तर पुरस्कार असे पुरस्कार देण्यात येणार आहे. शाल, रोख रक्कम, आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवमूर्तींचा सन्मान केला जातो.

# सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेकडून २६ गुन्हे उघडकीस

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या तिन्ही तपास पथकांनी गुन्हे उघडकीस आणण्यामध्ये भरीव कामगिरी केली असून त्यामध्ये २४ घरपोडी व २ चोरी असे एकूण २६ गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्यामध्ये आरोपींकडून १५ लाख ५८ हजार ५९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले असल्याची माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे व त्यांच्या पथकाने घरपोडीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे अनुषंगाने मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार एक आरोपी पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर येथे येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळवली होती, त्यानुसार या पथकाने गोपाळपूर येथे सापळा लावून आरोपी चंद्रकांत मधुकर चव्हाण (वय २८) याला ताब्यात घेतले. त्याने प्रारंभी उडवाउडवीचे उत्तरे दिली. मात्र पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी मंगळवेढा, सांगोला, पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, करकंब टेंभुर्णी व माळशिरस पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी व चोरीचे १६ गुन्हे त्याच्या साथीदारासह केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून १५ गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त केला आहे. त्यास न्यायालयाने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. त्याच्या ताब्यातून २३० ग्रॅम सोन्याचे दागिने, ३५० ग्रॅम चांदीचे दागिने असा एकूण ८ लाख ७४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असल्याचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी सांगितले. सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सहाय्यक पोलीस निरीक्षक शशिकांत शेळके यांच्या पथकाने वेळापूर पोलीस ठाण्याकडे दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास करताना घराचे बांधकाम करण्यासाठीपूर्वी आलेल्या भारत पोपट साठे (३८) यांच्यावर संशय असल्याने फिर्यादीने सांगितले होते. त्यानुसार साठे याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे कौशल्यपूर्ण तपास करताना त्याने गुन्ह्याची कबुली देऊन त्याच्याकडून दहा तोळे सोन्याचे दागिने, दहा चांदीचे बार व मोटरसायकल असा एकूण ५ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे यांच्या पथकाने पंढरपुरातील सुरज मकरंद पवार यांनी आकाश लक्ष्मण बंदपट्टे (२२) व अनिल भरतसिंग यांच्या मदतीने एकूण नऊ गुन्हे केल्याची कबुली दिली त्याच्या ताब्यातून १ लाख ९१ हजार दोनशे नव्वद रुपये किमतीचे सोने-चांदीचे दागिने मोबाईल व रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या पत्रकार परिषदेत अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, शशिकांत शेळके, पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे आणि त्यांच्या पथकातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या वाट्याला दुःख येवू नये असा आशीर्वाद गणरायाने द्यावा-कपिल पाटील

**भिवंडी/प्रतिनिधी**



देशातील सर्व जनतेवरील विघ्न दूर व्हावे, तसेच राज्यात काही ठिकाणी दुष्काळ तर काही ठिकाणी अतिवृष्टी यामुळे शेतकऱ्यांची वाताहत होऊ नये असा आशीर्वाद गणपती बाप्पाने द्यावा अशी प्रार्थना आपण गणराया चरणी केल्याची प्रतिक्रिया केंद्रीय पंचायतीराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिले आहे. ते भिवंडीत एकात्मतेचा राजा म्हणून गौरवल्या जाणाऱ्या धामणकर नाका मित्र मंडळाच्या सार्वजनिक गणेशोत्सव प्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष संतोष शेट्टी, भाजपा शहराध्यक्ष अँड हर्षल पाटील, पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक देशमुख, उपायुक्त दीपक झिंजाड, माजी सभागृह नेते सुमित पाटील, भाजपा माजी गटनेता हनुमान चौधरी, भाजपा ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष विठ्ठल नाईक, अखिल पद्मशाली समाज अध्यक्ष रामकृष्ण पोट्टाबत्तीनी आदी मान्यवर उपस्थित होते. धामणकर नाका मित्र मंडळाने गणेशोत्सवाच्या निमित्ताने उभारलेल्या भव्य श्री महामृत्युंजय मंदिराच्या पर्यावरण सजावटीची मुक्तकंठाने प्रशंसा केली. तर या निमित्त राबविण्यात येणारे विविध समाजोपयोगी उपक्रम तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती मंडळाचे अध्यक्ष संतोष शेट्टी यांनी फलकांद्वारे प्रकाशित करण्याची संकल्पना राबविल्याबद्दल त्यांचे सुध्दा कौतुक केले. या प्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी भेट देत गणरायाची पूजा अर्चना केली. तर यानिमित्त तीन गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवण यंत्र भेट देण्यात आले.

# ईद-ए-मिलादनिमित्त मनियार बीरादरीतर्फे ईद शिदोरीचे वाटप

**जळगाव/प्रतिनिधी**



ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त जळगाव जिल्हा मुस्लिम मणियार तसेच हिटलर डेनिम संस्थेच्या सहकार्याने जळगाव शहरात विविध ठिकाणी ईदच्या शिदोरीचे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने जिल्हा सामान्य रुग्णालय, कांताई सभागृह, शिरसोली नाका झोपडपट्टी, गणेश मंडळाचे निर्माल्य जमा करणारे कार्यकर्ते व बंदोबस्त करणारे पोलीस बांधवांना शिदोरीसह पाण्याची बॉटल देण्यात आली. ईद-ए-मिलादुन्नबी म्हणजे अंतिम प्रेषित हजरत मोहम्मद (स) यांची जयंती या निमित्त मन्यार बीरादरीने हा स्तुत्य उपक्रम राबविला.

अंतिम प्रेषित हे संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी ईश्वराने त्यांना या भूतलावर पाठवले होते व त्यांनी आपले जीवन कसे जगावे हे. जगाला दाखवून दिल्याने त्यांच्या या वाढदिवसाला कोणत्याही प्रकारचे अनाठाई खर्च किंवा उधळपट्टी न करता गरजवंत लोकांना ईदची शिदोरी म्हणजे (गोड भात)चे वाटप कंटेनरच्या माध्यमाने सुमारे १००० कंटेनर यावेळी वाटण्यात आले. यासोबत हिटलर डेनिम यांनी अर्धा लिटर पाण्याची बाटली सुद्धा दिली. जळगाव जिल्हा मनियार बिरादरीचे अध्यक्ष फारुख शेख यांच्या नेतृत्वात हिटलर डेनिम चे नूर खान, नावेद खान,नोबल खान, अमान खान, अबुजर खान, एंजल फूड फाऊंडेशनचे इम्रान खाटीक, साहिल शाह, मोहसीन शाह, रहमान शेख व दानियल अलाउद्दीन, मनियार बिरादरीचे रऊफ टेलर, अख्तर शेख, वसीम शेख, मोहसीन शेख, जुबेर पठाण व मुजाहिद शिकलगर तर उस्मानिया पार्कचे समाजसेवक समीर शेख आदींचे सहकार्य लाभले.

# मित्र फाऊंडेशन पालघर यांच्या माध्यमातून मित्र मंडळीला सहकार्य सक्षमीकरणाचा हात!

**पालघर/एच.लोखंडे**



मित्र फाउंडेशनच्या वतीने निलेश राऊत - सामाजिक कार्यकर्ते यांनी आपले ओबीसी आणि एस बी सी समाजातील तरूण, होतकरू, सुशिक्षित मित्रांना रोजगाराबाबत चर्चा, मार्गदर्शन आणि कर्ज योजना सबंधित माहिती साठी. शामराव पेजे ओबीसी वित्त विकास महामंडळ आणि वसंतराव नाईक महामंडळ यांच्या पालघर येथील विभागीय कार्यालये येथे स्वतः मित्रांनसह कार्यालयीन वेळेत जाऊन सक्षम अधिकारी वर्गासह अर्ज कसे मिळवता येईल व आपल्या तरूण सुशिक्षित मित्रांनाही आपल्या पायावर सक्षमपणे उभे राहिले पाहिजेत या भावनेने निलेश राऊत यांनी त्यांना ज्ञात असलेली, व मिळत असलेली माहिती मित्रांना देऊन मैत्री कार्याला, प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. या गाठीभेटी प्रसंगी महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी भावेश चामरे, श्रीमती प्रिती पातकर, श्रीमती ज्योती कांबळे यांनी आपापल्या परीने सर्वांना व्यवस्थित मार्गदर्शन केले. सर्व माहिती समजून उमजून घेतल्यानंतर निलेश राऊत आणि सोबत आलेल्या मित्रांना मिळालेली, विविध शासकीय योजना आणि कर्ज, अनुदान व लाभ याबाबत मिळालेली सविस्तर माहिती, आपल्या विभागात राहणारे मित्र मंडळी, गरजवंत, गरजू शेतकरी यांना देण्यासाठी स्थानिक पातळीवर जाऊन, सदर योजनेचा लाभ गरजूंपर्यंत पोहचवण्यासाठी मी व माझे मित्र फाऊंडेशनचे सहकारी प्रयत्न करीत राहणार असे निलेश राऊत यांनी सर्वान समक्ष अधिकारी वर्गाला सांगितले. यावेळी निलेश राऊत सह मित्र फाऊंडेशनचे पदाधिकारी व मित्र प्रदिप घरत-विराथन बू. माजी सरपंच, जगदिश पाटील -कांद्रेभूरे माजी सरपंच, गणेश भोईर-खेडीं, धर्मेंद्र वैद्य-दातीवरे, भूपेश घरत- डोंगरी विराथन हरेश वझे-टेंभोडे पालघर, वैभव घरत-डोंगरे-एडवण, हिरालाल लोखंडे - सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, ईशांत प्रधान पालघर आदी उपस्थित होते.

# भाजपा जिल्हा चिटणीस पदी प्रशांत पाटील यांची निवड



**देवणी/प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा चिटणीस पदी प्रशांत पाटील यांची निवड झाल्याबद्दल दवणहिप्परगा या जन्मगावी मित्र परिवार व ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना प्रशांत पाटील बोलताना म्हणाले की पक्ष नेतृत्वानी दिलेली जबाबदारी हे शोभेसाठी नसून या पदाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या माणसाला न्याय देण्याच्या प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले. यावेळी बालाजी बिरादार, दीपक बिरादार माजी सभापती सविता पाटील, व्हा.चेअरमन दैवशाला टिळे, रंगराव टिळे, तुकाराम टिळे, श्रीमंत तेलगावे, बळीराम टिळे, नितीन तेलगावे, माधव खारीवाले, कुलदीप पाटील, अमोल बिर्गे, प्रल्हाद कारभारी अजित तांबोलकर आदींसह मित्र परिवार उपस्थित होते.

## मनपाच्या आवाहनास लातूरकरांचा प्रतिसाद २१ हजार गणेशमूर्तींचे संकलन

लातूर : शहरातील नागरिकांनी घरोघरी स्थापन केलेल्या गणेशमूर्तींचे विसर्जन न करता या मूर्ती मनपाने उभारलेल्या संकलन केंद्रात दिल्या.या माध्यमातून गुरुवारी गणेश विसर्जनाच्या दिवशी २१ हजार ४९१ मूर्तींचे संकलन करण्यात आले. प्रदूषण मुक्तीसाठी नागरिकांनी केलेल्या या सहकार्याबद्दल पालिकेच्या वतीने नागरिकांचे आभार मानण्यात आले. गत वर्षी १४ हजार ६० मुर्ती संकलीत झाल्या होत्या. या वर्षी त्यापेक्षा जास्त मुर्ती संकलीत झाल्या आहेत. महापालिकेने घरगुती गणेश मूर्तींचे संकलन करण्यासाठी एकूण १५ ठिकाणी केंद्र उभारली होती. याशिवाय सार्वजनिक गणेश मंडळांच्या वतीने बसवण्यात आलेल्या मोठ्या मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी बारा नंबर पाटी येथील खदानीत व्यवस्था केली होती. मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी तेथे आपापल्या मूर्तींचे विसर्जन केले.

# वाडा तालुक्यातील तिळसा येथील तरुणांचा मनसेत प्रवेश




**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील तिळसे येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने शनिवारी (दि.३० सप्टेंबर) आयोजित केलेल्या एका कार्यक्रमा दराम्यान वाडा तीळसे येथील तरुण युवराज दुकले, हेमंत भोपी, प्रवीण डुकले, निखिल सोनवणे, सचिन गवळी, अविनाश गवळी, सागर भोपी, अक्षय गवळी, सतीश कडव, करण दुकले, सौरव काळे, देवेश कडव, समीर पाटील या तरुणांनी मनसेत प्रवेश केला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे व ठाणे पालघर जिल्हाध्यक्ष (नेते)अविनाश जाधव, प्रदेश उपाध्यक्ष डि.के. म्हात्रे, भिवंडी लोकसभा अध्यक्ष शैलेश बिडवी, ग्रामीण जिल्हाध्यक्ष भावेश चुरी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन तालुका अध्यक्ष कांतीकुमार ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मानसेमध्ये प्रवेश केला त्या वेळेस विकी काळे, स्वप्नील मोरे प्रशांत पाटील हे उपस्थित होते.

# खूपरी इंडस्ट्री मेंबर्स, पीडब्लुडी व एमएसईबीची बैठक संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

खूपरी इंडस्ट्री मेंबर्स यांनी विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महावितरण यांच्या संयुक्त बैठकीचे आयोजन केले होते. वाडा तालुक्यातील खूपरी येथील मुरली मनोहर हॉटेल येथे बुधवारी बैठक बोलावण्यात आली होती. या भागातील कंपन्यांचा विज पुरवठा वारंवार खंडित होने, विज पुरवठा खंडित झाल्यानंतर तो पूर्ववत सुरु होण्यास विलंब लागणे अशा समस्या उपस्थित केल्या तर रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांन बाबातही चर्चा झाली. बैठकीत सकारात्मक चर्चा करून खूपरी इंडस्ट्रीच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. चर्चेदरम्यान विज वितरण कंपनीचे अधिकारी शैलेश खंदारे यांनी कंपन्यांना होणाऱ्या गैरसोयींबाबत लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. महावितरनच्या वतीने पेट्रोलिंगसाठी दोन गाड्या देण्याचे कबूल केले तर कोकाकोला कंपनी कडून विज पुरवठा करण्याचेही आश्वासन दिले आहे. कंपनीच्या सदस्यांनी रस्त्यावरील खड्ड्यांबाबत विचारले असता, सार्वजनिक बांधकाम विभागचे कुरेशी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत पाऊस कमी झाल्यसनंतर रस्त्यावरील खड्डे भरून घेतले जातील तर कायम स्वसरूपी सिमेंट कॉंक्रिटीकरणासाठी डी.पी. आर. तयार केला जाईल अशी माहिती दिली. ही बैठक अगदी खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. बैठक यशस्वी करण्यासाठी खूपरी इंडस्ट्रीचे सदस्य चिराग दोषी आणि जयेश भाई यांनी मेहनत घेतली. यावेळी वाडा इंडस्ट्री असोसिएशनचे अनुराग धवन, मिलिंद वाडेकर उपस्तित होते.

02 TO 08 OCTOBER 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 9/30/2023 8:31 PM Page 1



# शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवणारे नेतृत्व सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख-गणपतराव बाजुळगे

## मारुती महाराज साखर कारखान्यांची २३वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न




**औसा/प्रतिनीधी**

संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्यांच्या २३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना चेअरमन गणपतराव बाजुळगे म्हणाले की, औसा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी स्व.लोकनेते विलासरावजी देशमुख यांच्या सहकार्याने कारखाना या परिसरात उभारण्यात आला.त्यामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्मे आनंद निर्माण झाला. परंतु मागील काही काळात हा कारखाना सतत ७वर्ष बंद पडल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात परवड होत होती.या परिसरातील शेतकऱ्यांची सतत मागणी होती की हा कारखाना सुरु व्हावा या मागणीचा विचार करत सहकार महर्षी यांच्याकडे लक्ष देत बंद पडलेला कारखाना पुनर्जीवित केला. सहकार महर्षी दिलीपराव देशमुख हे शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवणारे नेतृत्व असून बंद पडलेल्या अनेक कारखान्यांचे ते चालू करण्याची चावी ही फक्त दिलीपराव देशमुख यांच्याकडेच आहे. त्यांच्यामुळे हा संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखाना सुरु होऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांची परवड थांबली आहे, असेही ते सर्वसाधारण सभेत बोलताना म्हणाले. या सर्व साधारण सभेस याप्रसंगी कारखान्याचे, व्हा.चेअरमन शाम भोसले, संचालक सचिन पाटील, प्रदिप चव्हाण, विलास पाटील, अनिल झिरमीरे, हरिशंद्र यादव, सुरेश पवार, गितेश शिंदे, प्रविण कोपरकर सह औसा बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे माजी संचालक सुभाष जाधव, मांजरा कारखान्याचे तज्ञ संचालक महेंद्र भादेकर, माजी संचालक सुनिल उटगे औसा बाजार समितीचे माजी सभापती राजेंद्र भोसले, रेणा कारखान्याचे कार्यकारी संचालक बी व्ही मोरे बँक स्थाई तपाणीस सचिन देशमुख तसेच कारखान्याचे सर्व खातेप्रमुख, विभाग प्रमुख व कर्मचारी, कामगार व मोठ्या संख्येने सभासद यांचे उपस्थीत वार्षीक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

# तीन महिन्यांत तिसऱ्यांदा केला एटीएम उडवण्याचा प्रयत्न; अखेर झाले जेरबंद

**पुणे/प्रतिनिधी**

विद्येचे माहेरघर अशी ओळख पुण्याची आहे. मात्र गेल्या काही वर्षांमध्ये या शहरात गुन्हेगारीचं प्रमाण आणि तीव्रता प्रचंड वाढले आहे. रोज नवनव्या गुन्ह्यांच्या घटनेमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित होत आहे. गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसही शर्थीचे प्रयत्न करत आहेत. गुन्ह्याची अशीच एक धक्कादायक घटना पुण्यामध्ये उघड झाली आहे. पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा युनिटच्या अधिकाऱ्यांनी तीन जणांना अटक केली आहे. या तिघांनी गेल्या तीन महिन्यांच्या काळात तीन वेळा एटीएम मशीन उडवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. ते तिघे तिसऱ्यांचा एटीएम उडवण्याचा प्रयत्न करता असताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाले आणि पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्यांना अटक केली. विशाल छबू पाल्हारे (२०), अनिकेत संजय शिंदे (२०) आणि आदित्य प्रदीप रोकडे (२०) अशी आरोपींची नावे आहेत. त्यापैकी विशाल व अनिकेत हे दोघेही अहमदनगर जिल्ह्यातील रहिवासी असून आदित्य हा पुण्यातील शिरूर येथे राहणारा असल्याचे समजते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या तिनही आरोपींनी पैसे मिळवण्यासाठी पुणे- अहमदनगर हायवेवरील पारगाव येथील इंडिया वन कंपनीचे एटीएम मशीन उडवण्याचा प्रयत्न केला होता. मे महिन्यात हे एटीएम उडवण्याचा पहिला प्रयत्न करण्यात आला होता. त्यानंतर यावत पोलिस स्टेशन येथे एफआयआर दाखल करण्यात आली होती. स्फोटकांचा वापर केल्यानंतरही एटीएम उडवण्यात आरोपींना अपयश आले होते. त्यानंतर ६ जुलै आणि २६ जुलै रोजी आरोपींनी सेम पद्धत वापरून पुन्हा एटीएम उडवण्याचे दोन प्रयत्न केले खर पण त्यातही ते अपयशीच ठरले. यानंतर अज्ञात व्यक्तींविरोधात दोन वेगळ्या एफआयआर दाखल करण्यात आल्या. वारंवार घडणाऱ्या या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा युनिटच्या अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला. त्यानंतर सीसीटीव्ही फूटे तपासले असता, त्या आधारे पोलिसांनी तीनही आरोपींना अटक केली.



# वाड्यात विविध ठिकाणी राबवला स्वच्छता अभियान



**वाडा/प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समस्थ देश वाशियांना आपापल्या परिसरात स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ करण्याबत आवाहन केले आहे. त्या अनुषंगाने वाड्यात विविध ठिकाणी स्वच्छता अभियानातुन राबवून स्वच्छता करण्यात आली. दिवाणी व फौजदारी न्यायालय, वाडा येथे न्यायाधीश रितेश निकम यांच्यासह अँड. चंद्रकांत पाटील, अँड. जितेंद्र गायकवाड, अँड.संजय चोथे, अँड.सचिन पाटील, अँड.सुधिर पाटील, अँड.आकाश पाटील, सहाय्यक अधीक्षक संतोष सांबरे यांनी कोर्टाच्या आवारात स्वच्छता केली. तर गुरुकुल शाळेच्या विद्यार्थ्यांनी नगरपंचायत कार्यालय परिसर, बस स्थानक परिसर, तहसील कार्यालयाचा परिसर व पोलीस ठाण्याच्या आवारात स्वच्छता केली. दरम्यान वाड्यातील पी.जे. हायस्कुलचे बी.के.पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता अभियान अंतर्गत जनजागृती करण्याच्या उद्देशाने गावातून रॅली काढली व वेळी यु.एम.भानुशाली, एम.जी.पाटील, सी.टी.धापशी, पी.एन.थालेकर, के.टी.चौधरी आदी उपस्थित होते.

# पालघर जिल्हा कौंशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांत-ग्रंथालय सदृश्य अभ्यासिकेची सुरुवात

**पालघर/प्रतिनिधी**

करिअर विषयक साहित्य, अभ्यासिका व बेबसाईट विकास योजनेअंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पालघर येथे ग्रंथालय सदृश्य अभ्यासिकेची सुरुवात. सदर योजना हि राज्य शासनाची योजना असून बदलत्या आर्थिक व्यवस्थेमुळे पारंपारीक नोकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. बहुतेक बेरोजगार तरुणाला रोजगाराच्या नवनवीन संधीबाबतची माहिती नसल्याने तथा त्यास अनुरुप पात्रता ते धारण करीत नसल्याने मोठया संख्येने राज्यातील विशेषत: ग्रामीण भागातील उमेदवार हे रोजगारापासून वंचीत राहतात. त्यांना वेबसाईटद्वारे नव-नवीन संधींची व रोजगाराची माहिती उपलब्ध करुन देणे तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात येणाऱ्या बेरोजगारांना विविध व्यवसाय मार्गदर्शन साहित्य, स्पर्धा परिक्षांची माहिती देणारी मासिके, पुस्तके इ. उपलब्ध करुन देणे, अभ्यासिकेची व्यवस्था करणे व वेबसाईटच्या माध्यमातून नवीन संधींची व रोजगाराची माहिती उपलब्ध करुन देणे, असा या योजनेचा उद्देश आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांच्या आवारातील प्रशासकीय ईमारत ब, पहिला मजला, कक्ष क्रमांक १०९, येथे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,पालघर या कार्यालयात बेरोजगारांना विविध व्यवसाय मार्गदर्शन साहित्य, स्पर्धा परिक्षांची माहिती देणारी मासिके, पुस्तके इत्यादी उपलब्ध करुन देणे, अभ्यासिकेची व्यवस्था करणे, नवीन-नवीन संधींची व रोजगाराची माहिती उपलब्ध करुन देणे या उद्देशाने ग्रंथालय सदृश्य अभ्यासिका सुरु करण्यात आली आहे. या ग्रंथालय सदृश्य अभ्यासिकेत विविध विषयांवरील स्पर्धापरिक्षांकरिता उपयुक्त असलेली पुस्तके, मासिके, तसेच सर्व प्रकारची वर्तमानपत्रे विद्यार्थ्यांना विनामूल्य वाचनास उपलब्ध आहेत. ही पुस्तके वाचण्यासाठी स्वतंत्र अभ्यासिका उभारण्यात येऊन, यामध्ये बसून मुलांना ही पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास स्वतंत्रपणे टेबल व खूर्च्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. कार्यालयीन वेळेत विद्यार्थी येथे दिवसभर बसून पुस्तके वाचू शकतात, विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय तसेच स्वच्छतागृह येथे उपलब्ध आहे. तसेच कार्यालयात येणाऱ्या विदयार्थ्यांना करिअर विषयक तथा स्वंयरोजगार विषयक मार्गदर्शन करण्यासाठी कार्यालयात मॉडेल करिअर सेंटरही स्थापन करण्यात आले असून, या सेंटरमधील तज्ञांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. वरील ग्रथांलय सदृश्य अभ्यासिका व करिअर विषयक मार्गदर्शन या सुविधा विद्यार्थ्यांना विनामुल्य पुरवल्या जातात. तरी पालघर जिल्हयातील सर्व बेरोजगार तरुण/तरुणींनी या विनामूल्य शासकीय योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभाकर हरडे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पालघर. यांनी केले आहे.

# आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्जदारांनी १५ ऑक्टोबर २०२३ पर्यंत अर्ज करावे!

**पालघर/प्रतिनिधी**

महा ई-सेवा केंद्र, सेतू सुविधा केंद्र, नागरी सुविधा केंद्र तसेच संग्राम केंद्र यांना आपले सरकार सेवा केंद्रे हे नाव देऊन सर्व कॉमन सर्व्हिस सेंटरचे एक सारखे बँडिंग करण्यात आले आहे. आपले सरकार सेवा केंद्रांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळावर सोपविण्यात आली असलेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय पालघर यांचे मार्फत कळविले आहे. जिल्हयातील रिक्त असलेल्या ठिकाणी आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करून ऋठ्ठउ सेवा कार्यान्वीत करणेबाबतची जाहीर नोटीस जिल्हाधिकारी कार्यालयाच्या https://palghar.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रिक्त असलेल्या आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्जदारांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ ते १५ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत जिल्हाचे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या अर्ज ऑफलाईन पध्दतीने सादर करावा. अर्जदार यांचेकडे अर्ज सादर करते वेळी सी.एस.सी आय.डी असणे आवश्यक आहे. आवश्यक असलेल्या ठिकाणी संग्राम केंद्र आयडीधारक असल्यास त्यांस प्रथम प्राधान्य देणेत येईल. या बाबत अधिकची माहिती जिल्हयाचे संकेतस्थळावर, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली असलेबाबतची माहिती जिल्हाधिकारी गोविंद बोडके, यांनी दिली आहे.

# सारथी अंतर्गत कौंशल्य विकास कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन

**पालघर/प्रतिनिधी**

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी मार्फत सारथीच्या लक्षीत गटातील (मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी मराठा) उमेदवारांना रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याकरीता सारथीच्या लक्षित गटातील उमेदवारांची जमवाजमव करण्याकरिता महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या संकेतस्थळावर उमेदवारांमार्फत कौशल्य प्रशिक्षण व अभ्यासक्रम मागणी नोंदविण्याकरिता नोंदणी फॉर्म तयार करण्यात आलेला आहे. सदरील नोंदणीची लिंक https://kaushalya.mahaswayam.gov.in/users/sarthi हि आहे. तरी कौशल्य प्रशिक्षण घेण्यास इच्छुक असलेल्या सारथीच्या लक्षीत गटातील (मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी मराठा) उमेदवारांनी https://kaushalya.mahaswayam.gov.in/users/sarthi या लिंकवर भेट देऊन नोंदणी करून आपला सहभाग निश्चित करावा. तसेच सदस्बाबत वारंवार अद्ययावत होणाऱ्या माहितीकरीता या फेसबुस पेजला लाईक करावे. असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पालघर यांनी केले आहे.

# बोईसर येथील डॉ.स.दा.वर्तक विद्यालयाच्या मैदानावर राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी जिल्हा क्रीडा परिषद पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनच्या तांत्रिक सहकार्याने पालघर जिल्ह्यात पहिल्यांदाच संपन्न होणाऱ्या सतरा वर्षाखाली मुले व मुलींची राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा बोईसर येथील डॉ. स. दा. वर्तक विद्यालयाच्या मैदानावर सोमवार दिनांक २ व ३ ऑक्टोबर रोजी संपन्न होणार आहे. या स्पर्धेविषयी माहिती देताना जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने यांनी सांगितले की १७ वर्षाखालील व्हॉलीबॉल मुले व मुली राज्यस्तरीय स्पर्धा प्रथमच जिल्ह्यात होत असून यात लातूर, कोल्हापूर, अमरावती, औरंगाबाद, पुणे, मुंबई आणि नाशिक या आठ विभागातून मुलांचे व मुलींचे संघ सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा क्रीडा परिषद अध्यक्ष गोविंद बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली विविध समित्या नेमण्यात आल्या असून स्पर्धेची तयारी ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याचे सुहास व्हनमाने यांनी सांगितले जिल्हा निर्मिती झाल्यानंतर प्रथमच नऊ वर्षांनी राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा पालघर जिल्ह्यातील बोईसर येथील डॉ स.दा. वर्तक विद्यालयाच्या मैदानावर दोन व तीन ऑक्टोबर रोजी होणार आहेत. स्पर्धेची उद्घाटन सोमवारी २ ऑक्टोबरला सकाळी १०:३० वाजता राज्याचे क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय राज्यमंत्री पंचायतराज कपिल पाटील, सार्वजनिक बांधकाम तथा पालकमंत्री रवींद्र चव्हाण, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम,खासदार राजेंद्र गावित सर्वश्री आमदार हितेंद्र ठाकूर, राजेश पाटील, सुनील भुसारा, क्षितिज ठाकूर, विनोद निकोले, श्रीनिवास वनगा, निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे उपस्थित राहणार आहेत अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास वनमाने यांनी दिली. स्पर्धेचा पुरस्कार वितरण सोहळा ३ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजता संपन्न होणार असून या पुरस्कार सोहळ्यासाठी जिल्हाधिकारी गोविंद बोडके बोईसर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नंदकुमार वर्तक त्याचप्रमाणे इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पान १ वरून....

## संशयाने पतीची मती गुंग झाली...

होती. त्यामुळे दोघातील भांडण काही मिटत नव्हते. वारंवार दोघांमध्ये वाद होत असायचे. मागील दोन-तीन वर्षापासून घोगरे नावाच्या इसमाच्या घरात ते भाड्याने रहात होते. विशाल हा मखमलाबाद परिसरातील एका मार्बलच्या दुकानात मजूर म्हणून काम करायचा. त्याच्या कमाईवर संसाराचा गाडा ओढतांना कसरत करावी लागत होती. ही ओढाताण होऊ नये म्हणून धनश्री ही धुणी- भांडीचे काम करून संसाराला हातभार लावत असे, पण त्याला याची जाणीव नव्हती. तो तिच्याशी वाद घालतच होता. सुमारे एक महिन्यापूर्वी विशाल व धनश्री या दोघांमध्ये भांडण झाले. ही गोष्ट तिच्या वडीलांना समजली, तेंव्हा शंकर हे तातडीने निघाले आणि मुलीला माहेरी घेवून जाण्यासाठी आले. वडीलांना तिने दुःख सांगितले, पण संसार सोडून जाण्यास ती तयार नव्हती. पती, संसार, मुलगा यांच्यासाठी ती सासरीच नांदणार होती, पण पतीच तिचा छळ करत असल्याने त्याला समजावून सांगावे अशी तिची अपेक्षा होती, त्यामुळे ती त्यांच्यासोबत जाण्यास तयार झाली नाही. उलट ती त्यांना म्हणाली की, 'काहीही झाले तरी मी माझ्या नवऱ्यासोबतच राहीन, पण तुमच्याबरोबर येणार नाही.' त्यामुळे तिचे वडील तसेच आपल्या गावी निघून आले. मंगळवार दि. १२ सप्टेंबर २०२३ रोजी कामावरून धनश्री उशीरा घरी आली. उशीर का झाला म्हणून विशालने तिला विचारणा करत तिच्याशी भांडण काढले. त्यांचे जोरजोरात चाललेले भांडण ऐकून घरमालक गणपत डोंगरे हे भांडण सोडवण्यासाठी आले, तेंव्हा विशालची आई त्यांना म्हणाली की, तुम्ही आमच्या भांडणात पडू नका. त्यानंतर नातू रूद्र यास सोबत घेवून घरातून बाहेर पडली. जवळच्याच मंदिरात विशालची आई नातवाला घेऊन झोपायला गेली, घरमालकही तेथून आपल्या घरी निघून गेला. आता घरात फक्त विशाल आणि धनश्री हे दोघेच होते. दुसरा दिवस उजाडला. विशालची आई लिलाबाई घरी आली असता समोरचे दृष्य पाहून ती हादरलीच, कारण घरात धनश्री निपचित पडली होती. तिच्या डोक्याजवळील भागातून रक्त येत होते. आई आणि मुलगा मंदिरात झोपायला गेल्यावर विशालने झोपेतच केंव्हातरी धनश्रीच्या डोक्यात घरातील दगडी वरवंटा मारून तिला ठार मारले होते. तसेच त्याने रो हाऊसच्या पहिल्या मजल्यावरील हॉलच्या छताला ओढणीने बांधून गळफास घेतला होता. हॉलच्या मागून असलेल्या किचन रूमच्या खोलीत जमिनीवरील गादीवर पडलेल्या धनश्रीच्या डोक्यावर गंभीर जखम होवून रक्तस्त्राव होवून ती मयत झाली होती. चारित्र्याचा संशय घेवून विशालने धनश्री झोपेत असतांना तिच्या डोक्यात दगडी वरवंटा घालून तिचा निर्घृणपणे खून केला होता. त्यानंतर आत्महत्या केली होती. या घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त नितीन जाधव, पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी पाटील, उपनिरीक्षक सुभाष जाधव, हवालदार सुरेश नरवाडे, शिवाजी आव्हाड आदींनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले. आपल्या मुलीचा खून करून जावयाने आत्महत्या केल्याची माहिती समजताच शंकर वाघ हे धावत-पळत धनश्रीच्या घरी आले. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा रजि. नं. २७४/२०२३ मयत विशाल निवृत्ती घोरपडे याच्याविरोधात भा.दं.वि. ३०२ कलमाखाली गुन्हा नोंद झाला. सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी पाटील या गुन्ह्याचा तपास करत आहेत. विशालने आपल्या पत्नीला ठार मारले आणि स्वतः ही आत्महत्या केली. हे करत असतांना त्याला आपल्या मुलाचा आणि वृद्ध आईचा विचार करावासा वाटला नाही, हे मोठे दुर्दैव आहे.

पान ८ वरून....

## शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या...

प्रसिध्दी करण्यात येईल, अशी माहिती आयुक्त डॉ.कल्याणकर यांनी यावेळी दिली. शिक्षक मतदार संघाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या यादीमध्ये ज्या व्यक्तिंची नावे समाविष्ट आहेत. अशा सर्व व्यक्तींना सुध्दा नवीन यादी तयार करतांना विहीत नमुन्यात नव्याने अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. शिक्षक मतदार संघाच्या अर्हतेसाठी जी व्यक्ती भारताची नागरिक आहे आणि त्या मतदारसंघाची सर्वसाधारणपणे रहिवासी आहे तसेच जिने दिनांक १ नोव्हेंबर २०२३ पूर्वी लगतच्या सहा वर्षामध्ये राज्यातील एखादया माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये एकूण किमान तीन वर्ष अध्यापनाचे काम केले आहे, अशी व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट केले जाण्यास पात्र राहील. तसेच शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादीत नाव दाखल करण्यासाठी सादर केलेल्या नमुना १९ मधील अर्जासोबत संबंधित व्यक्तीने दिनांक १ नोव्हेंबर २०२३ पूर्वी लगतच्या सहा वर्षामध्ये एखादया माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये एकूण किमान तीन वर्ष अध्यापनाचे काम केले असल्याबाबत शैक्षणिक संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. पदवीधर मतदार संघाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या यादीमध्ये ज्या व्यक्तिंची नावे समाविष्ट आहेत, अशा सर्व व्यक्तींना सुध्दा नवीन यादी तयार करतांना विहीत नमुन्यात नव्याने अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. पदवीधर मतदार संघाच्या अर्हतेसाठी जी व्यक्ती भारताची नागरिक आहे आणि त्या मतदार संघातील सर्वसाधारण रहिवासी आहे आणि ती १ नोव्हेंबर २०२३ पुर्वी किमान ३ वर्षे भारताच्या राज्यक्षेत्रातील विद्यापीठाची एकतर पदवीधर असेल किंवा त्याच्याशी समतुल्य असलेली अर्हता धारण करीत असेल अशी प्रत्येक व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यास पात्र आहे. ३ वर्षाचा कालावधी हा ज्या दिनांकास अर्हता पदवी परीक्षेचा निकाल जाहिर करण्यात आला असेल आणि ते विद्यापीठ किंवा अन्य संबंधीत प्राधीकरण यांच्याकडून प्रसिद्ध करण्यात आला असेल त्या दिनांकापासून मोजण्यात येईल. नमुना १८ मधील अर्जासोबत पदवीशी समतुल्य म्हणून निर्दिष्ट करण्यात आलेली अर्हता (Specified Qualifications) या पुरावा स्वसाक्षांकीत केलेला व अतिरिक्त पदनिर्देशीत अधिकाऱ्यांनी अधिप्रमाणीत करुन जोडणे आवश्यक आहे. खोटे निवेदन व खोटी माहिती देणारी व्यक्ती लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० चे कलम ३१ अन्वये शिक्षेस पात्र असेल. नमुना १८ मधील छापील अर्ज मतदार नोंदणी अधिकारी-सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी-पदनिर्देशित अधिकारी यांच्या कार्यालयाकडून मिळविता येईल. हस्तलिखीत टंकलिखीत चक्रमुद्रीत किंवा खाजगीरित्या छापलेले अर्ज देखील स्वीकारले जातील.

# लातूरसह प्रत्येक तालुक्यात होणार गाथा मुक्तीसंग्रामाची नाटकाचे प्रयोग

लातूर : मराठवाडा मुक्ती दिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त अँड. शैलेश गोजमगुंडे व डॉ. सतीश साळुंके लिखीत गाथा मुक्ती संग्रामाची हे नाटक लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात होणार आहे. राज्य सरकारच्या सांस्कृतिक संचालनालयाची निर्मिती असलेल्या या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग लातूरमध्ये १ आक्टो. २०२३ रोजी, सायं. ६ वाजता मार्केट यार्डातील नाट्यगृहात होणार आहे. तर दि. २ आक्टो. जळकोट, ३ आक्टो. देवणी ४ आक्टो. निलंगा ५ आक्टो. चाकूर ६ आक्टो. रेणापूर ७ आक्टो. अहमदपूर ८ आक्टो. उदगीर ९ आक्टो. औसा १० शिरुर अनंतपाळ आदी तालुक्यात होणार आहे.

02 TO 08 OCTOBER 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 9/30/2023 8:31 PM Page 1



# दरोड्याच्या तयारीत असलेल्या दरोडेखोरांना अटक; ४ पिस्टल, एक गावठीकट्टा व ५९ जिवंत काडतुस जप्त



लातूर/करकरे अंबादास

गणेश उत्सव विसर्जनाच्या बंदोबस्तात व्यस्त आसणाऱ्या लातूर पोलिस दलाला चकवा देवून दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या परप्रांतिय दरोडेखोरांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अतिशय शिताफिने अटक करत उत्कृष्ठ कामगीरी केली आहे. या कारवाहीत पोलिसांनी ४ पिस्टल, एक गावठीकट्टा व ५९ जिवंत काडतुसाह दरोड्यासाठी वापरात येणारे साहित्या जप्त केले आहे. लातूर जिल्ह्यात घडणाऱ्या चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी पोलीस रात्रगस्त व रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करण्याची मोहीम संपूर्ण लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात व प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. तसेच कोंबिंग ऑपरेशन राबवून चोरी, घरफोडी करणाऱ्या आरोपींना, फरार आरोपींना ताब्यात घेतले जात आहे. तसेच गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीचे संकलन व विश्लेषण करून गुन्ह्यांची उकल करण्यात येत आहे. दिनांक २८ सप्टेंबर २०२३ रोजी चाकूर उपविभागीय पोलीस अधिकारी तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांना बातमीदार कडून माहिती मिळाली की, लातूर पोलीस गणेश उत्सवाच्या व विसर्जनाच्या बंदोबस्तात व्यस्त असणार याचा अभ्यास करून व तशी संधी साधून काही दरोडेखोर लातूर ते मुरुड जाणारे रोडवर दरोडा टाकण्याच्या तयारीने साहित्य महाराष्ट्र ग्रामीण बँक ते किया शोरूम दरम्यान संशयितरित्या दोन मोटार सायकल वरून फिरत आहेत अशी माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी सदर माहितीची खातरजमा करून सदरची माहिती खरी असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांनी तात्काळ सदरची माहिती वरिष्ठांना कळविली. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथक दिनांक २८ सप्टेंबर २०२३ रोजी संध्याकाळी १७:३० वाजण्याच्या सुमारास दरोडा टाकण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र ग्रामीण बँक ते किया शोरूमला जाणारे रोडच्या परिसरात बातमी प्रमाणे पाच इसम रोडच्या साईडला थांबलेले दिसले त्यांच्यावर सदर पथकाने छापा मारून ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा पाच पैकी दोन ताब्यात आले व तीन इसमाने त्यांच्या जवळील दोन बॅग जागेवरच टाकून च्या दिशेने पळून गेले त्यांचा पाठलाग केला परंतु ते मिळून आले नाहीत. दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या दोन आरोपींना त्यांच्याकडे बॅगा व इतर साहित्यासह पथकामार्फत ताब्यात घेण्यात आले. त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव दरोडा घालण्याच्या तयारीत असलेले इसम नामे विकासकुमार पिता श्रीगोपाल शरण गुप्ता, वय २७ वर्ष, राहणार पोस्ट तिउरी ठाणा, मानपुर जिल्हा नालंदा राज्य बिहार. (अटक), अमितकुमार रवींद्रसिंग यादव, वय २२ वर्ष राहणार फतवा तहसील, जिल्हा पटना राज्य बिहार. (अटक), शिवकुमार उर्फ संजीव कुमार यादव वय ३० वर्ष, राहणार हाजीपुरा जिल्हा वैशाली राज्य बिहार. (फरार), लकीकुमार राजकुमार प्रधान(, वय २८ वर्ष, राहणार गांधी मार्केट, पश्रि्चम सारंगपूर ,पश्रि्चम बिहार, दिल्ली.(फरार), छोटू उर्फ ननकी यादव,( वय १९ वर्ष, राहणार जामा मजीद जवळ,वैशाली जिल्हा, राज्य बिहार) असे असल्याचे सांगितले त्यांची व सोबतच्या आरोपींनी जागेवरच टाकून दिलेल्या दोन बॅगाची झडती घेतली असता त्यांच्याकडे चार पिस्टल, एक गावठीकट्टा, ५९ जिवंत काडतुस तसेच एक बार अँटींना असलेले मोबाईल नेटवर्क जैमर, एक मोबाईल नेटवर्क जामरचे रेंज फिक्वेन्सी डिटेक्टर अँटीना एक चार्जर, चार वेगवेगळ्या कंपनीचे सिमकार्ड सह मोबाईल, काळे रंगाचे कापडी मास्क, रबरी हॅण्डग्लोज, लोखंडी रॉड, बासुसिंह नांवाचे बनावट आधार कार्ड, एक ड्रायव्हिंग लायसन, दोन मोटार सायकल चे कागदपत्र, मो.सा.क्र. MH-28-BE-6753 चे आरसी बुक, प्रशांतकुमार नांवाने तयार केलेले एक बनावट आधार कार्ड , एक ड्रायव्हिंग लायसन ,एक ढतड कंपनीची काळे रंगाची RTR-160 मोटार सायकल पासींग नंबर MH-28-BE-6753 असा असलेली, लोखंडी/प्लॅस्टीकची मुठ असेलेले तीन चाकु व तीन कातरी, एक लोखंडी पक्कड, दोन खाकी रंगाचे चिकटपट्टी बंडल आणि एक कापडी मास्क असा एकूण ३,५६,२३०/-रुपयाचा मुद्देमाल एक मोबाईल ग्रामर एक मोटर सायकल असे साहित्य मिळून आले. त्यांना अधिक विचारपूस केली असता त्यांनी सांगितले की, पटना येथील कारागृहातील गुन्हेगार सुबोधसिंग राहणार चंडी जिल्हा नालंदा राज्य बिहार याचे संपर्कात असून त्यांने,आम्ही दोघे व आमच्यासोबत असलेले व पळून गेलेले बिहार येथील तीन जणांनी कर्नाटक राज्यातील आळंदी येथे किंवा महाराष्ट्रातील लातूर येथील एखाद्या बँकेवर किंवा सराफ दुकानावर किंवा गोल्ड फायनान्स आस्थापनावर दरोडा टाकण्याचा कट रचला होता. व त्याप्रमाणे दरोडा टाकण्यासाठी पूर्ण तयारीनिशी सदर परिसरात थांबल्याचे कबूल केले. त्यावरून नमूद आरोपी विरुद्ध पोलीस अमलदार खुर्रम काझी यांनी दिलेल्या फिर्याद वरून नमूद पाच आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ७३०/२०२३ कलम ३९९, ४०२, १२०(१), ४२०, ४६५, ४६८, भादवी ३ (१) २५,७(अ)/२५ शस्त्र अधिनियम १९५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे एमआयडीसी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके हे करीत आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपी हे बिहार राज्यातील सराईत गुन्हेगार असून गणेशउत्सव व विसर्जनामध्ये पोलीस व्यस्त असणार याचा फायदा घेऊन लातूर मध्ये काहीतरी मोठा दरोड्याचा गुन्हा करण्याच्या पूर्ण तयारीसह चार पिस्टल, एक गावठी कट्टा व तब्बल ५९ जिवंत काढतुसह बनावट आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स तसेच दरोड्यासाठी वापरण्यात येणारे विविध साहित्य हॅन्डग्लोज, मास्क चिकटपट्टी, लोखंडी रॉड, कटर ,कात्रीसह मिळून आलेले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेने अतिशय कार्य कुशलतेने दरोड्याची आधीच माहिती मिळवून दरोडेखोरांना गुन्हा करण्याच्या अगोदरच ताब्यात घेतली आहे. त्यामुळे बाहेर राज्यातील सराईत दरोडेखोरांना दरोड्याचा मोठा गुन्हा करण्यापासून रोखले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनात केलेल्या कार्यवाहीचा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी कौतुक केले आहे. तसेच नमूद गुन्हेगारांनी दरोडा टाकताना सदर परिसरातील मोबाईल नेटवर्क जाम होण्याकरिता मोबाईल जामर बाळगलेले असून पोलिसापर्यंत वेळेत माहिती पोहोचू नये, किंवा इतर लोकांचा आपसात संपर्क होऊ नये हा उद्देश असल्याचा दिसून येत आहे. नमूद फरार आरोपींच्या स्थानिक गुन्हे शाखेकडून शोध सुरू असून संबंधित गुन्हेगारांनी यादी कोठे कोठे गुन्हे केले आहेत या संदर्भात तपास सुरू आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकटेश आलेवार पोलीस अंमलदार खुर्रम काझी, राहुल सोनकांबळे, यशपाल कांबळे, योगेश गायकवाड, संपत फड, मनोज खोसे, प्रदीप चोपणे, रामहरी भोसले यांनी केली आहे.

# देवणी तालुक्यातील प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या वतीने चंद्रशेखर बावनकुळे यांचा निषेध!

देवणी/प्रतिनिधी



चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकारांनी आपल्या विरोधात बातम्या लिहू नयेत म्हणून त्यांना चहाला बोलवा आणि त्यांना धाब्यावर घेऊन जा असे निंदनीय कृत केल्याने देवणी तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने त्यांचा निषेध करण्यात आला. भारतीय जनता पक्षाच्या महाविजय २०२४ 'लोकसभा प्रवास' या 'घर चलो अभियान'साठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सध्या राज्यभर फिरत होते.ते अहमदनगर दोऱ्यावर आले असताना, यावेळी त्यांनी भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांची बैठक घेऊन या अभियानाची कार्यशाळा घेतली. यामध्ये त्यांनी आपल्या विरोधात बातम्या येऊ नयेत, यासाठी काय काळजी घ्यायची, यासंबंधी बोलताना धक्कादायक सल्ला दिला. पत्रकारांना दर महिन्याला चहाला बोलवा, त्यांना ढाब्यावर जेवायला घेऊन जा,' असा सल्लाच बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना दिला. पत्रकारांना दर महिन्याला चहा प्यायला बोलवायचे म्हणजे समजलेच असेल तुम्हाला असे सांगायलाही बावनकुळे विसरले नाहीत. बावनकुळे यांची उपस्थितीत या अभियानाची कार्यशाळा झाली.

पत्रकारासंबंधी केलेल्या नीच प्रवृत्तीचे संभाषण करून लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ पत्रकार याचे मन दुखावले आहे. म्हणून देवणी तालुका प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या वतीने देवणी तहसील येथील अव्वल कारकून रितेश कवरे यांना निवेदन देऊन जाहीर निषेध करण्यात आला.यावेळी निवेदनात प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे देवणी तालुकाअध्यक्ष लक्ष्मण रणदिवे, पत्रकार गिरीधर गायकवाड, शकील मणियार, बालाजी टाळीकोटे, जाकीर बागवान, जयेश ढगे, नरसिंग सूर्यवंशी, कृष्णा पिंजरे, सचिन मंगनाळे, दिलीप शिंदे यांच्यासह अनेक पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पालघर तालुका आदर्श शिक्षक पुरस्काराने मिलिंद सोगले सन्मानित

पालघर/एच.लोखंडे



पालघर तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार गुणगौरव समारंभ दिनांक २७ सप्टेंबर २०२३ रोजी माध्यमिक शिक्षक पतपेढी भवन पालघर पश्चिम येथे मोठ्या उत्साहात व मान्यवर यांच्या उपस्थितीत शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील काम करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांचा पालघर तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पालघर तालुक्यातील एकुण ३२ जिल्हा परिषद शाळा, केंद्रामधून ३४ शिक्षकांची यासाठी निवड करण्यात आलेली. मिलिंद सोगले हे जिल्हा परिषद शाळा, विश्रामपूर - केंद्र चहाडे येथील प्रमुख कार्यरत शिक्षक आहेत. ते नावझे ता. जि. पालघर गावांचे स्थानिक असून, त्यांना या आधीही अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. क्रीडा, सहकार, शिक्षण क्षेत्राचा त्यांना दांडगा अनुभव आहेच. परंतु गायन, सूत्रसंचालन, वक्तृत्वाचीसुद्धा त्यांना आवड आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्रीम. शैला कोळेकर सभापती पंचायत समिती पालघर व्यासपीठावर विराजमान होत्या तर विशेष अतिथी व मान्यवर म्हणून राजेंद्र गावीत - खासदार पालघर. प्रकाश निकम- अध्यक्ष जिल्हा परिषद पालघर, रवींद्र चव्हाण - पालकमंत्री पालघर, ज्ञानेश्वर म्हात्रे - विधान परिषद सदस्य, निरंजन डावखरे विधान परिषद सदस्य, श्रीनिवास वनगा - आमदार पालघर विधानसभा. राजेंद्र पाटील - आमदार बोईसर विधानसभा, मिलिंद वडे उपसभापती पालघर, मनीषाताई निमकर -सभापती समाज कल्याण समिती. जिल्हा परिषद पालघर, तथा माजी राज्यमंत्री, पंकज कोरे- सभापती शिक्षण वित्त समिती जिल्हा परिषद पालघर. तसेच श्रीम. संगीता भागवत- शिक्षणाधिकारी माध्यमिक, शेवराव वडे-शिक्षण अधिकारी प्राथमिक, भानुदास पालवे - मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर, नरेंद्र खेडकर गटविकास अधिकारी पालघर यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. या प्रसंगी सर्व जिल्हा परिषद सदस्य, सर्व पंचायत समिती सदस्य, त्याच प्रमाणे विभागीय विस्तार अधिकारी, शिक्षक गण, शैक्षणिक शेत्रातील मान्यवर आदीच्या उपस्थितीत तालुकास्तरीय आदर्श एकूण ३४ शिक्षकांना शाल, श्रीफळ, प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन मान्यवर यांच्या हस्ते पालघर तालुका आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# साडेपाच लाखांची चोरी करणाऱ्या चोरट्यास चोवीस तासात केले जेरबंद



सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर शहरातील मुरारजी पेठेतील अवंती नगरात पाच लाख साठ हजार रुपयांची चोरी करणाऱ्या चोरट्यास फौजदार चावडी पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेच्या पथकाने २४ तासात ताब्यात घेऊन त्याच्याकडील रोख रक्कम हस्तगत केली आहे. आफताब सत्तार अत्तार (२३) असे अटक करण्यात आलेले आरोपीचे नाव आहे. माहिती अशी की फिर्यादी मोहसीन आयुब शेख (२५) याचा मोबाईल शॉपीचा व्यवसाय असून तो सोमवारी सकाळी राहत्या घरात पैशाचा बॉक्स उचलून खुर्चीवर ठेवून साफसफाई केली. दरम्यान दरवाजा पुढे करून बाथरूम मध्ये गेले असता अज्ञात चोरट्याने ती रक्कम चोरून नेल्याची घटना घडली होती. या गुन्ह्याबाबत फौजदार चावडी पोलिसांना जुना पुना नाक्याजवळील एका लॉजमध्ये चोरीतील रक्कम घेऊन थांबल्याची माहिती मिळाली त्यानुसार पोलिसांनी त्याला शिफातीने जेरबंद केले.

# वाड्यातील गणेशघाट येथे गणरायाचे विसर्जन



वाडा : वाडा शहरतील सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणरायाच्या विसर्जना पूर्वी वाड्यातून मोठ्या भक्ती भावाने, नाचत, गाजत, ढोल ताश्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. गुड लक यंग क्लब आगर आळी, आदर्श गणेश मंडळ अंजनी नगर,नवतरुण मित्र मंडळ भानुषाली आळी, ओमकार मित्र मंडळ नेहरू नगर, वैश्य समाज मित्र मंडळ वाणी आळी, जय भवानी भाजी मार्केट (मार्केटचा राजा), संजय गांधी नगरचा राजा, कोळीवाडाचा राजा व इतर अशा एकूण ११ सार्वजनिक मंडळाच्या तर काही घरगुती बाप्पाचे विसर्जन झाले. दरम्यान भाजपाचे उपजिल्हा अध्यक्ष संदीप पवार यांनी सर्व मंडळावर पुष्पवृष्टी करून गणेश भक्तांचे स्वागत केले. या प्रसंगी वाडा पोलीस निरीक्षक सुरेश कदम व इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवल्याणे विसर्जन सोहळा शांततेत पार पडला.

# दवणहिप्परगा येथील बाल गणेश मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर



देवणी/प्रतिनिधी

देवणी तालुक्यातील दवनहिप्परगा येथे मल्हारराव होळकर नगर मधील बाल गणेश मित्र मंडळाच्या वतीने रक्त दान शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी २१ पेक्षा अधिक रक्त दात्यांनी रक्तदान केले.

कार्यक्रमाच्या प्रास्तविक मध्ये प्रशांत पाटील बोलताना म्हणाले की अन्नदाना पेक्षा रक्तदान हे सर्वश्रेष्ठ असते आपण दिलेले रक्त एखादया माणसाचे आयुष्य वाचवु शकतो त्याच्या परिवाराच्या आनंद द्विगुणित करण्यास मदत होते, सामाजिक उपक्रम हे दिशादर्शक ठरावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्याचे मनस्वी अभिनंदन केले. यावेळी माऊली ब्लड बँकेचे माधव बिरादार, स्वामी व बाल गणेश मित्र मंडळाचे नितीन तेलगावे शुभम टिळे, सुशांत टिळे, हणमंत धडे, शिरीष बमणे, हणमंत तेलगावे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# व्यसन न करता आपल्या आरोग्याची काळजी आपणच घेतली पाहिजे -आम.वनगा



पालघर/प्रतिनिधी

जागतिक हृदय दिनानिमित्त धानिवरी ता. डहाणू जि. पालघर येथे लुपिन फाउंडेशनव्दारे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. श्री. श्रीनिवास वनगा आमदार पालघर विधानसभा यांनी जागतिक हृदय दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना सांगितले. व्यसन न करता आपल्या आरोग्याची काळजी आपणच घेतली पाहिजे. तसेच सर्वांनी विविध व्यसने सोडून आपले व आपले आपल्या कुटुंबाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी काळजी घेणे हि आपली जबाबदारी आहे. त्यासाठी नियमित आरोग्य तपासणी, चांगल्या प्रकारचे आहार, सकस अन्न ग्रहण केले पाहिजेत. त्यानें आपले व आपल्या कुटुंबाचे आरोग्य चांगले राहील. कोणीही अंधश्रध्देच्या आहारी न जाता नियमितपणे आरोग्य तपासणी केली पाहिजेत. हृदय विकार येण्याचे प्रमाण वाढते आहे. कार्यक्रमाची सुरुवात देवी सरस्वती प्रतिमा पूजनाने करण्यात आली. उपस्थित डॉक्टरांनी हृदय विकार आणि त्यासंबंधित सविस्तर माहिती आलेल्या श्रोत्यांना दिली. त्यानंतर महिलांच्या विविध स्पर्धा सुद्धा घेण्यात आल्या. सदर कार्यक्रमास निलेश म्हात्रे - लुपिन कंपनीचे मॅनेजर, डॉ. क्षितिज शहा- मेडिकल ऑफिसर, शैलेश कोरडा- सरपंच, सौ. सुरेखा तांबडा- उपसरपंच, तवा प्राथमिक रुग्णालयाच्या डॉ.मोनाली, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य सह नामदेव तांबडा - सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ, महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिमुकल्या कलावंतांचा केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी केला सन्मान



भिवंडी/प्रतिनिधी

आमच्या पप्पांनी गणपती आणला हे गाणं संपूर्ण महाराष्ट्रात आबालवृद्धांच्या मुखी असताना या गाण्याचे मुळ चिमुकले गायक मोहित घोरपडे व शौर्य घोरपडे हे भिवंडी तालुक्यातील राहनाळ गावातील चरणी पाडा येथील रहिवाशी आहेत. प्रसिद्धी पासून दूर असलेल्या या चिमुकल्या गायकांसह गीताचे गायक मनोज घोरपडे यांना माध्यमांनी प्रसिद्धी दिल्यानंतर त्यांची राजकीय सामाजिक स्तरा वरून अनेकांनी दखल घेतली आहे. राहनाळ गावचे माजी सरपंच राजेंद्र भोईर यांच्या सौजन्याने नुकताच केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या शुभहस्ते हायवे दिवे येथील निवासस्थानी मोहित व शौर्या या चिमुकल्या गायकांचा तसेच स्टार प्रवाह वरील मी होणार सुपरस्टार छोटे उस्ताद या गायना वरील कार्यक्रमात टॉप फाईव्ह मध्ये पोहचलेल्या काव्या शैलेश भोईर याचा सन्मान केला आहे. भिवंडी ग्रामीण मध्ये सुध्दा अनेक कलागुणांनी संपन्न मुळे आहेत त्यांना समाजा समोर आणण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याची गरज आहे असे सांगत तालुक्याला नव्हे जिल्ह्याला अभिमानास्पद असलेले हे कलावंत माझ्या मतदारसंघातील असल्याचा आनंद आहे, अशी प्रतिक्रिया केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी दिली आहे.याप्रसंगी आयोजक राजेंद्र भोईर, भाजपा पदाधिकारी श्रीकांत गायकर, राम माळी, नितीन पाटील उपस्थित होते.

02 TO 08 OCTOBER 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 9/30/2023 8:32 PM Page 1



# उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते विवेक पंडित यांच्या 'माणूस म्हणून जगण्यासाठी' या अनुभव कथन पुस्तकाचे प्रकाशन



**पालघर/प्रतिनिधी**

महाराष्ट्रात अनेक थोर व्यक्तींनी केलेल्या प्रबोधनामुळेच महाराष्ट्र घडला आहे. जागतिक, वैश्विक, घटनात्मक चौकट समजली की समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडता येते. तसेच सरकारने केलेल्या सामाजिक कायद्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही सामाजिक संघटनांची असल्याचे प्रतिपादन विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. आज मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर रोजी, श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित यांच्या 'माणूस म्हणून जगण्यासाठी' या अनुभव कथन पुस्तकाचे आणि आम्ही काय र चिखुल खावा? याच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन सनराइज बँक्वेट बाभोळा वसई (पश्चिम)येथे महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आले. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, समाजाची मानसिकता महिलांना कमी लेखणारी असते. त्यामुळे महिलांमध्ये धैर्य राहत नाही. मात्र हे धैर्य लोकांशी संवाद साधल्याने येत असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. लोकांच्या आंदोलनातून ऊर्जा आणि स्फूर्ती मिळत असल्याची भावना डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली. बालमजुर, अत्याचारित स्त्रियांचे पुनर्वसन होणे आवश्यक असून सरकार समोरील मोठे आव्हान असल्याचे डॉ गोऱ्हे यांनी म्हटले. प्रशासनाची वेळोवेळी मदत होत असली तरी काही वेळा त्यांच्यावरही दबाव असतो. त्यातून न्याय मिळायला वेळ लागतो. श्रमजीवी संघटनेकडून करण्यात येणारे काम बहुमूल्य असे आहे. पुस्तकातून माणूस म्हणून जगण्यासाठीचा संघर्ष समजतो हे महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. श्रमजीवी संघटनेच्या आंदोलनाचा उपयोग समाजातील वंचितांसाठी कायमच होत आला आहे तो पुढेही होत राहील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विवेक पंडित यांनी विधानपरिषद, विधानसभा, लोकसभा, राज्यसभा यांपैकी कोणत्याही एका सभागृहात लोकप्रतिनिधी म्हणून पुन्हा यायला पाहिजे. संघटनेसोबत त्यांनी सभागृहात असणं गरजेचं आहे. त्यांनी हार मानू नये. त्यांच्यासाठी दरवाजे उघडे असल्याचे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी म्हटले. विवेक पंडित म्हणाले, पराभूत मानसिकतेचा प्रत्यय सर्वच वर्गात दिसतो. याविरोधात आवाज कसा उठवायचा हे या पुस्तकातून सांगायचा प्रयत्न केला आहे. आजही अनेक महिलांना वेठबिगारी करावी लागते. महिलांवर होणाऱ्या अन्यायाला विधानभवनात बैठका घेऊन न्याय देण्याचे काम उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी, प्रा.अशोक बागवे, अशोक मुळे, डॉ.नेहा सावंत, विधिज्ञ सुरेश कामत, सुरेश रेंजड आणि डॉ. नितीन आरेकर, नम्रता मुळे, शिवसेना जिल्हा प्रमुख निलेश तेंडुलकर, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, तहसीलदार अविनाश कोष्टी यांसह मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुणाल रेगे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती. स्नेहा पंडित-दुबे यांनी केले.

# जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवार आक्रमक; २ ऑक्टोबरपासून बेमुदत साखळी उपोषणाला सुरूवात



**लातूर/प्रतिनिधी**

मंजूर होऊनही गेल्या १० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जिल्हा रुग्णालयाचा प्रश्र्न तात्काळ सोडविण्यात यावा यासह लातूर येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे खासगीकरण करण्याचा शासन निर्णय रद्द करावा आणि सोयाबीन संशोधन केंद्र लातूरलाच झाले पाहिजे या प्रमुख मागण्यांसाठी माझं लातूर परिवाराच्या वतीने येत्या २ ऑक्टोबर २०२३ पासून शहरातील गांधी चौक येथे बेमुदत साखळी उपोषण करण्यात येत आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, मनपा आयुक्त आणि गांधी चौक पोलिस निरिक्षक यांना माझं लातूर परिवाराच्या वतीने देण्यात आले आहे. तसेच या आंदोलनाची माहिती आणि निवेदन ईमेलद्वारे मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, कृषी मंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री, लातूर जिल्हा पालक मंत्री यांनाही पाठविण्यात आल्याची माहिती माझं लातूर परिवाराच्या वतीने देण्यात आली आहे. दरम्यान मंजूर झालेल्या जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न त्वरित सोडवावा. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे खासगीकरण करण्याचा निर्णय रद्द करावा. सोयाबीन संशोधन केंद्र लातूरला झालेच पाहिजे. या प्रमुख मागण्या मान्य होईपर्यंत माझं लातूर परिवाराचे साखळी उपोषण सुरू राहील. लातूरच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व सजग नागरिकांनी या आंदोलनात सहभागी होऊन आंदोलनाला बळ द्यावे असे आवाहन माझं लातूर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# पालघर ओबीसी हक्क संघर्ष समितीचे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे निवेदन!

**पालघर/एच.लोखंडे**



सन २०११च्या जनगणनेनुसार नवनिर्वाचित पालघर जिल्ह्यातील अंदाजे लोकसंख्या २९-९० लक्ष एवढी होती. सन २०१४ मध्ये नवनिर्वाचित पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात येऊन, पंचायत विस्तार (अनुसूचित शेत्र) पेसा कायदा २४ डिसेंबर १९९६ अधिनियम अन्वये, पालघर जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. सत्य परिस्थिती पाहता, जिल्ह्यातील ३७% टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातीची (S.T.) असून, ५९% टक्के लोकसंख्या ओबीसी समाजाची दिसून येते आहे. परंतु पालघर जिल्ह्याला पेसा अधिनियम लागू करून, जिल्ह्यातील १७ वर्गगांमध्ये 'क' आणि 'ड' पदाकरिता १००% टक्के आरक्षण ठेवून, त्यांनुसार नोकरभरती जाहिरात देण्यात आली असताना, त्या विरूद्ध ओबीसी समाजा व्दारे उच्च न्यायालयात आव्हान देवून. याचिका सुध्दा दाखल करण्यात आली आहे. शासनाने लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण आरक्षण देण्यात यावे. याबद्दल आदेश काढलेला असूनही, पालघर जिल्ह्यातील नोकर भरतीत ओबीसी समाजातील उमेदवारावर अन्याय होत आहे. या अनुषंगाने दिनांक २९ एप्रिल २०२२ रोजी मा. जिल्हाधिकारी पालघर कार्यालयावर भव्य मोर्चा काढून, या अन्यायाविरुद्ध सविस्तर निवेदन ही देण्यात आले आहे. परंतु अद्यापही ओबीसी समाजाला न्याय मिळालेला नाही. त्याकरिता या, सरकारच्या या अन्यायाविरुद्ध, ओबीसी संघर्ष समिती पालघरव्दारे पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर, लवकरच हजारो ओबीसी बांधवासह भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात येत आहे. मोर्चातील प्रमुख मागण्या : ओबीसी समाज जातनिहाय जनगणना कार्यक्रम जाहीर करणे. पालघर जिल्ह्यात पेसा अधिनियमांची अंमलबजावणी करून, नोकर भरती प्रक्रियेत ओबीसीना २७% टक्के आरक्षण देवून भरती प्रक्रिया करावी. मराठा समाजाला सरसकट कुणबी दाखले, न देता ओबीसी कोट्यातून आरक्षण.राज्यघटनेच्या तरतुदी अनुसार शिक्षण, नोकरी व राजकीय शेत्रातही २९% टक्के आरक्षण मिळाले पाहिजे. स्थानिक स्वराज्य स्वराज्य संस्था मध्ये कमी करण्यात आलेले, रद्द केलेले ओबीसी आरक्षण पूर्ववत करावे. प्रत्येक जिल्ह्यात, जिल्ह्याच्या ठिकाणी, ओबीसी विद्यार्थीसाठी युपीएससी, एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करावेत. ओबीसी आर्थिक महामंडळा करिता भरीव आर्थिक निधीची तरतूद करून, सुक्षशित, बेरोजगार यांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यात आले पाहीजे. वरीलप्रमाणे मागण्या संदर्भात २७ सप्टेंबर २०२३ रोजी गोविंद बोडके जिल्हाधिकारी पालघर यांना राजीव पाटील अध्यक्ष ओबीसी हक्क समिती पालघर, कुंदन संखे, पी.टी. पाटील सर व इतर पदाधिकारी यांनी मागण्या संदर्भात व नियोजित भव्य आणि दिव्य मोर्चाचे आयोजन सबंधित लेखी निवेदन दिले आहे.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत पालघर जिल्ह्यातील ७५ लाभार्थांची हृदयरोग तपासणी

**पालघर/प्रतिनिधी**



पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम हा यशस्वीपणे राबविला जात असून पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांर्गत एकूण ३२ आरोग्य पथके कार्यरत आहेत. सदरील पथके हि जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी यांना वर्षातून २ वेळा व शाळांना वर्षातून १ वेळा प्रत्यक्ष भेटी देऊन बालकांची व मुलांची आरोग्य तपासणी करत असतात. सन २०२३-२४ या वर्षात ० ते ६ वयोगटातील एकूण २२२५४० बालकांपैकी ११९८६१ बालकांची व ६ ते १८ वयोगटातील एकूण ३४१९१४ मुलांपैकी ४२६०१ मुलांची आरोग्य पथकांमार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली. आरोग्य तपासणी करण्यात आलेल्या लाभार्थ्यांपैकी इतर रोगग्रस्त पैकी ३१ लाभार्थ्यांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या त्यापैकी ३ रुग्णांच्या कोक्लेअर इम्प्लांट व ३२ लाभार्थ्यांच्या हृदयरोग शस्त्रक्रिया करण्यात आल्या. तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ.संजय बोदडे यांच्या मार्गदशनाखाली आणि डॉ.सचिन वाघमारे व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.योगेश सुरळकर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १६ सप्टेंबर २०२३ रोजी बालाजी हॉस्पिटल, भायखळ्याल पिडीयाट्रिक कार्डीओलॉजिस्ट डॉ.वर्षा माने, बालाजी हॉस्पिटल रुग्ण समन्वयक प्रतिक मिश्रा यांच्या मार्फत २ डी इको (हृदयरोग तपासणी) शिबीर घेण्यात आले सदर शिबिरामध्ये ७५ रुग्णांची तपासणी करण्यात आली त्यापैकी २५ रुग्णांना शस्त्रक्रिया करण्याचे नियोजित आहे. तसेच ३३ रुग्ण साधारण व ४ रुग्ण जोखमीच्या हृदयरोगाने ग्रस्त असल्याने सदर रुग्णांना हायर सेंटर ला संदर्भित केलेले आहे या पैकी १३ रुग्णांना पुन्हा तपासणी करिता ६ महिने आणि एक वर्षानी बोलावण्यात आले आहे. या शिबिरासाठी ग्रामीण रुग्णालय पालघरच्या वैद्यकीय अधिक्षका डॉ.दीप्ती गायकवाड, जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक, प्रदिप पागी, सांखिकी अन्वेषक, मानसी पाटील यांच्या सहकार्याने व पालघर जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या परिश्रमाने शिबीर पार पडले. या शिबिरामध्ये आढळून आलेल्या बालकांवर बालाजी हॉस्पिटल, भायखळा येथे हृदयरोग शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

# प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील राजमाता जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांचा वाढदिवसाविविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के.ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी.एन.केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, मुख्याध्यापक स्वाती केंद्रे, समन्वयक वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, समन्वयक राजीव मुंढे, प्रा.अश्विनी केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, सुनीता जवळे अन्य शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.यानिमित्त वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यानिमित्त यापुढेही या शैक्षणिक संकुलातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व शैक्षणिक साहित्य वितरण करण्यात येणार असल्याचे संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी सांगितले. प्रारंभी संस्थेच्या अध्यक्षा जायेभाये यांच्या हस्ते प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांचे औक्षण करून केक कापून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजीव मुंढे यांनी केले तर आभार उपप्राचार्य कविता केंद्रे यांनी मानले.

# शौर्यदिन हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा दिवस -जिल्हाधिकारी

**लातूर/प्रतिनिधी**



भारतीय सैन्याने केलेल्या सर्जिकल स्ट्राईकचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी २९ सप्टेंबर हा दिवस शौर्यदिन म्हणून साजरा होतो. हा दिवस प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात शौर्यदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे, ले. कर्नल (नि.) बी. आर. हरणे, मेजर (नि) व्ही. व्ही. पटवारी यांच्यासह माजी सैनिक संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी आणि शौर्यपदक प्राप्त सैनिकांचा सन्मान करण्यात आला. तसेच माजी सैनिकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती, अर्थसहाय्यचे धनादेश वितरीत करण्यात आले. प्रारंभी दीपप्रज्ज्वलन आणि शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आपले सर्वस्व पणाला लावून देशाच्या सीमेवर कर्तव्य बजाविणाऱ्या सैनिकांमुळे आपण सर्वजण सुरक्षितपणे जीवन जगत आहोत. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या सैनिकांचा, त्यांच्या कुटुंबियांच्या त्यागाचा आदर केला पाहिजे. आजी-माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन सदैव कटीबद्ध असून दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी प्रत्येक तहसील कार्यालयात आजी-माजी सैनिकांच्या समस्या ऐकून घेण्यात येत असून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. तसेच शौर्यदिन हा राष्ट्रप्रेमाची भावना जाज्वल्य करणारा दिवस असून यानिमित्ताने प्रत्येकाने आपल्या समाजासाठी, देशाच्या विकासासाठी योगदान देण्याचा निश्र्चय करावा, असे आवाहना त्यांनी यावेळी केले. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल (नि.) शरद पांढरे यांनी प्रास्ताविकामध्ये शौर्यदिन आयोजनाची पार्श्वभूमी विषद केली. तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयामार्फत माजी सैनिक पाल्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती, अर्थसहाय्य याबाबत माहिती दिली. दिपाली हरणे व त्यांच्या चमूने यावेळी विविध देशभक्तीपर गीते सादर केली.

# ईद-ए-मिलाद निमित्त वाड्यात भव्य मिरवणूक



**वाडा/प्रतिनिधी**

शुक्रवारी (दि.२९ सप्टेंबर) वाडा शहरातील मुख्य बाजारपेठेतून ईद ए मिलाद निमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. ईद-इ-मिलाद हा सण मुस्लिम बांधवांसाठी अतिशय महत्वाचा असून मोहम्मद पैगंम्बर यांच्या जन्मदिनानिमित्त हा सण अतिशय उत्साहात साजरा केला जातो. शांती व सदभावणेचा संदेश देण्याच्या उद्देशाने ही मिरवणूक काढण्यात आली असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अदनान धांगे यांनी दिली. मशिद येथून निघालेली मिरवणूक खंडेश्वरी नाका येथून पुन्हा बाजारपेठेतून मशिद नाका येथून दर्गा येथे मिरवणुकींची सांगता झाली. सदर मिरवणुकीत पाचशेहून अधिक मुस्लिम बांधव उपस्थित होते. येथील दर्ग्यात देशात सर्वधर्म समभावाचे विचार मनी रुजावे, भाईचारा, शांती व सद्भावना निर्माण व्हावी यासाठी प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी मुस्लिम बंधवांसह वाड्याचे पोलीस निरीक्षक सुरेश कदम व पल्लवी बाने आदी उपस्थित होते.

# शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या नवीन मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर

**नवी मुंबई/प्रतिनिधी**



मुंबई पदवीधर, मुंबई शिक्षक व कोकण पदवीधर मतदार संघासाठी नव्याने मतदार यादी तयार करण्यासाठी मा.भारत निवडणूक आयोगाकडून दि.३० सप्टेंबर ते दि.३० डिसेंबर २०२३ या कालावधीत यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून कोकण विभागातील पदवीधरांनी जास्तीत जास्त प्रमाणात मतदार नोंदणीसाठी सहभाग घ्यावा, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले. आज कोकण भवनातील समिती सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारत निवडणूक आयोगाकडून दि. ३० सप्टेंबर ते ३० डिसेंबर २०२३ या अर्हता दिनांकावर आधारीत शिक्षक व पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. या घोषित कार्यक्रमानूसार मुंबई पदवीधर, मुंबई शिक्षक व कोकण पदवीधर मतदारसंघाची टप्प्या टप्याने नव्याने मतदारयादी तयार करण्यात येणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या जाहीर करण्यात आलेल्या कार्यमक्रमानूसार दि. ३० सप्टेंबर २०२३ रोजी मतदार नोंदणीसाठी जाहिर सूचना प्रसिध्द करण्यात येईल. दि. १६ ऑक्टोबर २०२३ रोजी मतदार नोंदणी अधिनियम १९६०नुसार वर्तमानपत्रात दिलेल्या नोटीसीची प्रथम पुर्नप्रसिध्दी करण्यात येईल. दि.२५ ऑक्टोबर २०२३ रोजी मतदार नोंदणी अधिनियम १९६० नुसार वर्तमानपत्रात दिलेल्या नोटीसीची द्वितीय पुर्नप्रसिध्दी करण्यात येईल. दि.०६ नोव्हेंबर २०२३ रोजी नमुना-१८ किंवा नमुना-१९ द्वारे दावे व हरकती स्विकारणाचा अंतिम दिनांक राहील. दि. २० नोव्हेंबर २०२३ रोजी हस्तलिखिते तयार करणे व प्रारुप मतदार याद्यांची छपाई करण्यात येईल. दि.२३ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी करण्यात येईल. दि. २३ नोव्हेंबर २०२३ ते दि.०९ डिसेंबर २०२३ या कालावधीत दावे व हरकती स्विकारली जातील. दि. २५ डिसेंबर २०२३ रोजी दावे व हरकती निकाली काढण्यात येतील तसेच पुरवणी यादी तयार करुन छपाई करण्यात येईल. दि.३० डिसेंबर २०२३ रोजी मतदार याद्यांची अंतिम ...पान ६ वर

# शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम पीकविमा तात्काळ द्या; तुळजापूर मोडवर 'रास्ता रोको'

**औसा/शिवाजी मोरे**



२५ टक्के अग्रीम पीकविमा रक्कम देण्याचे आदेश काढूनही शेतकऱ्यांच्या खात्यावर २५ टक्के अग्रीम रक्कम अजूनही जमा झाली नाही. म्हणून शेतकऱ्याच्या खात्यावर २५ टक्के अग्रीम रक्कम तात्काळ जमा करावी आणि लातूर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये तात्काळ मदत देण्यात यावी, यासह विविध मागण्यांसाठी औशाचे माजी आमदार दिनकरराव माने यांनी सक्रीय होत आंदोलन केले. माने यांच्या नेतृत्त्वाखाली औसा येथे तुळजापूर मोडवर (साई चौक) रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या मागण्या येत्या चार-पाच दिवसात मान्य नाही झाल्या तर शिवसेना स्टाईलने अतिशय तीव्र आणि तीव्र पद्धतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी माने यांनी दिला. शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी रात्री अपरात्री विजपुरवठा होत आहे, तोही सुरळीत नाही. अशा परिस्थितीमध्ये रात्री वे रात्री शेतकरी आपल्या शेतात गेल्यानंतर जंगली जनावरे, सर्पदंश अशा या घटनेला बळी पडून आज कित्येक लोक शासकीय रुग्णालयात दाखल आहेत. काही शेतकऱ्यांनी आपला प्राण गमावला आहे. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्याची जीवितहानी टाळायची असेल तर शेतकऱ्याला शेतीसाठी दिवसा किमान आठ तास अखंडित वीज पुरवठा करण्यात यावा. त्याच पद्धतीने संपूर्ण महाराष्ट्रात मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन सरसकट मराठा आरक्षण द्यावे, औसा मोड येथे होत असलेल्या उड्डाणपूल बंदीस्त पद्धतीचा न करता पिलरवरती खुल्या पद्धतीचा करण्यात यावा, यासाठी हा रास्ता रोको करण्यात आला. या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजी माने, उपजिल्हाप्रमुख बजरंग जाधव, तालुकाप्रमुख तानाजी सुरवसे, तालुका समन्वयक संतोष सूर्यवंशी, उपशहर प्रमुख सचिन पवार, अल्पसंख्यांक सेलचे तालुकाप्रमुख सलीम पटेल, ओबीसी सेलचे संघटक प्रवीण चव्हाण, विधानसभा समन्वयक संदिपान शेळके,जयश्री उटगे, श्रद्धा जवळेकर, प्रीती कोळी, वाघमारे, महादेव साळुंखे, पुजारी, बहुरे, उपतालुकाप्रमुख, आबासाहेब पवार, प्रसाद भोसले यांच्यासह शिवसैनिक व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.